सहायक भर्ती (विभागीय) स्पर्धा परीक्षा - 2013

# A

2014

परीक्षा दि. 23 फेब्रुवारी 2014

CODE : LO3

प्रश्नपुस्तिका क्रमांक
BOOKLET NO.

एकूण प्रश्न : 150

वेळ : $2\frac{1}{2}$ ( अडीच ) तास

प्रश्नपत्रिका क्र. 2

एकूण गुण : 300

## सूचना

(1) सदर प्रश्नपुस्तिकेत 150 अनिवार्य प्रश्न आहेत. उमेदवारांनी प्रश्नांची उत्तरे लिहिण्यास सुरुवात करण्यापूर्वी या प्रश्नपुस्तिकेत सर्व प्रश्न आहेत किंवा नाहीत याची खात्री करून घ्यावी. असा तसेच अन्य काही दोष आढळल्यास ही प्रश्नपुस्तिका समवेक्षकांकडून लगेच बदलून घ्यावी.

परीक्षा-क्रमांक

केंद्राची संकेताक्षरे

शेवटचा अंक

(2) आपला परीक्षा-क्रमांक ह्या चौकोनांत **न विसरता बॉलपेनने** लिहावा.

(3) वर छापलेला प्रश्नपुस्तिका क्रमांक तुमच्या उत्तरपत्रिकेवर विशिष्ट जागी उत्तरपत्रिकेवरील सूचनेप्रमाणे **न विसरता नमूद करावा.**

(4) (अ) या प्रश्नपुस्तिकेतील प्रत्येक प्रश्नाला 4 पर्यायी उत्तरे सुचविली असून त्यांना 1, 2, 3 आणि 4 असे क्रमांक दिलेले आहेत. त्या चार उत्तरांपैकी सर्वात योग्य उत्तराचा क्रमांक उत्तरपत्रिकेवरील सूचनेप्रमाणे तुमच्या उत्तरपत्रिकेवर नमूद करावा. अशा प्रकारे उत्तरपत्रिकेवर उत्तरक्रमांक नमूद करताना तो संबंधित प्रश्नक्रमांकासमोर छायांकित करून दर्शविला जाईल याची काळजी घ्यावी. **ह्याकरिता फक्त काळ्या शाईचे बॉलपेन वापरावे, पेन्सिल वा शाईचे पेन वापरू नये.**

(ब) **मंत्रालयातील लिपिकवर्गीय कर्मचाऱ्यांनी विभाग - "अ" आणि विभाग- "ब" सोडविणे आवश्यक आहे आणि महाराष्ट्र लोकसेवा आयोगातील लिपिकर्गीय कर्मचाऱ्यांनी विभाग - "अ" आणि विभाग "क" सोडविणे आवश्यक आहे.**

(5) सर्व प्रश्नांना समान गुण आहेत. यास्तव सर्व प्रश्नांची उत्तरे द्यावीत. घाईमुळे चुका होणार नाहीत याची दक्षता घेऊनच शक्य तितक्या वेगाने प्रश्न सोडवावेत. क्रमाने प्रश्न सोडविणे श्रेयस्कर आहे पण **एखादा प्रश्न कठीण वाटल्यास त्यावर वेळ न घालविता पुढील प्रश्नाकडे वळावे.** अशा प्रकारे शेवटच्या प्रश्नापर्यंत पोहोचल्यानंतर वेळ शिल्लक राहिल्यास कठीण म्हणून वगळलेल्या प्रश्नांकडे परतणे सोईस्कर ठरेल.

(6) उत्तरपत्रिकेत एकदा नमूद केलेले उत्तर खोडता येणार नाही. नमूद केलेले उत्तर खोडून नव्याने उत्तर दिल्यास ते तपासले जाणार नाही.

(7) **प्रस्तुत परीक्षेच्या उत्तरपत्रिकांचे मूल्यांकन करताना उमेदवाराच्या उत्तरपत्रिकेतील योग्य उत्तरांनाच गुण दिले जातील. तसेच "उमेदवाराने वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरूपाच्या प्रश्नांची सर्वात योग्य उत्तरेच उत्तरपत्रिकेत नमूद करावीत. अन्यथा त्यांच्या उत्तरपत्रिकेत सोडविलेल्या प्रत्येक चार चुकीच्या उत्तरांसाठी एका प्रश्नाचे गुण वजा करण्यात येतील".**

पर्यवेक्षकांच्या सूचनेविना हे सील उघडू नये

## ताकीद

**ह्या प्रश्नपत्रिकेसाठी आयोगाने विहित केलेली वेळ संपेपर्यंत ही प्रश्नपुस्तिका आयोगाची मालमत्ता असून ती परीक्षाकक्षात उमेदवाराला परीक्षेसाठी वापरण्यास देण्यात येत आहे. ही वेळ संपेपर्यंत सदर प्रश्नपुस्तिकेची प्रत/प्रती, किंवा सदर प्रश्नपुस्तिकेतील काही आशय कोणत्याही स्वरूपात प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणे कोणत्याही व्यक्तीस पुरविणे, तसेच प्रसिद्ध करणे हा गुन्हा असून अशी कृती करणाऱ्या व्यक्तीवर शासनाने जारी केलेल्या "परीक्षांमध्ये होणाऱ्या गैरप्रकारांना प्रतिबंध करण्याबाबतचा अधिनियम-82" यातील तरतुदीनुसार तसेच प्रचलित कायद्याच्या तरतुदीनुसार कारवाई करण्यात येईल व दोषी व्यक्ती कमाल एक वर्षाच्या कारावासाच्या आणि/किंवा रुपये एक हजार रकमेच्या दंडाच्या शिक्षेस पात्र होईल.**

**तसेच ह्या प्रश्नपत्रिकेसाठी विहित केलेली वेळ संपण्याआधी ही प्रश्नपुस्तिका अनधिकृतपणे बाळगणे हा सुद्धा गुन्हा असून तसे करणारी व्यक्ती आयोगाच्या कर्मचारीवृंदापैकी, तसेच परीक्षेच्या पर्यवेक्षकीयवृंदापैकी असली तरीही अशा व्यक्तीविरूद्ध उक्त अधिनियमानुसार कारवाई करण्यात येईल व दोषी व्यक्ती शिक्षेस पात्र होईल.**

पुढील सूचना प्रश्नपुस्तिकेच्या अंतिम पृष्ठावर पहा

www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial

कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK

www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial

## विभाग 'अ'

1. भारताचे संविधानातील अनुच्छेद 40 राज्य धोरणाचे कोणते निदेशक तत्व स्पष्ट करते ?

   (1) समान न्याय व कायदेविषयक मोफत सहाय्य

   (2) ग्रामपंचायतींचे संघटन

   (3) कामगारांना निर्वाह भत्ता

   (4) नागरिकांकरता रूप नागरी संहिता

---

2. राज्याच्या नियंत्रणाखालील कोणत्याही पदावरील सेवा योजन किंवा नियुक्ती संबंधीच्या बाबींमध्ये सर्व ________ समानसंधी असेल.

   (1) संप्रदायाला (2) व्यक्तींना (3) नागरिकांस (4) गटाला

---

3. भारताच्या संविधानातील अनुच्छेद क्र. 17 अन्वये ________ नष्ट करण्यात आली आहे.

   (1) अस्पृश्यता (2) राज्याची व्याप्ती

   (3) सार्वजनिक सेवायोजनाच्या बाबी (4) किताब

---

4. राज्य धोरणांची निदेशक तत्वे भारताच्या संविधानातील कोणत्या भागात वर्णन केली आहेत ?

   (1) भाग 1 (2) भाग 2 (3) भाग 3 (4) भाग 4

---

5. भारतीय संविधानाच्या अनुच्छेद –23 मधील तरतुदीनुसार :

   (अ) : माणसांचा अपव्यापार, बिगार-वेठबिगार यांना मनाई करण्यात आली आहे.

   (ब) : धर्म, वंश, जात वा वर्ग या अथवा यापैकी कोणत्याही कारणावरून भेदभाव करता येणार नाही.

   **पर्यायी उत्तरे :**

   (1) (अ) बरोबर (2) (ब) बरोबर

   (3) (अ) आणि (ब) दोन्ही बरोबर (4) (अ) आणि (ब) दोन्ही चूक

---

**कच्च्या कामासाठी जागा**



www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial

6. भारतीय संविधानाच्या अनुच्छेद 32 अन्वये प्रदान केलेले हक्क बजावण्याकरता समुचित कार्यवाहीद्वारे ________ कडे अर्ज, विंनती करण्याच्या हक्काची हमी देण्यात आली आहे.

   (1) पंतप्रधान (2) उच्च न्यायालय (3) सर्वोच्च न्यायालय (4) यापैकी नाही

7. भारतीय संविधानाच्या समानतेच्या हक्कासंदर्भातील अनुच्छेदानुसार ________ यांच्याकरिता राज्य कोणतीही विशेष तरतूद करू शकेल.

   (1) बालके (2) स्त्रीया व बालके (3) स्त्रीया (4) यापैकी नाही

8. भारतीय संविधानाच्या अनुच्छेद 31 मधील मालमत्तेचा हक्क हा ________ व्या घटनादुरूस्तीन्वये निरसित केला गेला आहे.

   (1) 40 (2) 42 (3) 44 (4) यापैकी नाही

9. ''राज्य हे देशाच्या पर्यावरणाचे संरक्षण व संवर्धन करण्यासाठी प्रयत्नशील राहील'' हे मार्गदर्शक तत्त्व कोणत्या घटनादुरुस्तीन्वये भारतीय संविधानात समाविष्ट करण्यात आले आहे ?

   (1) 69 (2) 42 (3) 44 (4) 48

10. खालीलपैकी कोणते विधान **योग्य** आहे ?

    (a) राज्य ग्रामीण क्षेत्रांमध्ये वैयक्तिक किंवा सहकारी तत्वावर कुटीरोद्योग संवर्धन करण्यासाठी प्रयत्नशील राहील.

    (b) राज्य, कोणत्याही उद्योगधंदयात गुंतलेले उपक्रम, किंवा अन्य संघटना यांच्या व्यवस्थापनांमध्ये कामगारांना सहभागी होता यावे म्हणून उपाय योजना करील.

    **पर्यायी उत्तरे :**

    (1) वरील दोन्ही योग्य (2) दोन्ही अयोग्य (3) फक्त (a) (4) फक्त (b)

11. दुकाने, सार्वजनिक उपहारगृहे, हॉटेल आणि सार्वजनिक करमणुकीच्या ठिकाणी प्रवेशासंबंधीचा हक्क हा ________ हक्क आहे.

    (1) स्वातंत्र्याचा (2) समानतेचा

    (3) धर्मस्वातंत्र्याचा (4) भारताच्या राज्यक्षेत्रात सर्वत्र मुक्तपणे संचार करण्याचा

**कच्च्या कामासाठी जागा**

www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial

12. "भारताची __________ , एकता व __________ उन्नत ठेवणे व त्यांचे संरक्षण करणे" हे भारतीय नागरिकाचे कर्तव्य आहे.

(1) अस्मिता, एकात्मिकता
(2) सार्वभौमता, एकात्मता
(3) सुरक्षा, एकात्मता
(4) सार्वभौमता, विविधता

---

13. मुलांना कायद्यानुसार शिक्षणाचा अधिकार कोणत्या तरतूदीनुसार प्राप्त झालेला आहे ?

(1) अनुच्छेद 21 (क) (2) अनुच्छेद 22 (क) (3) अनुच्छेद 20 (1) (4) उपरोक्त सर्व

---

14. राज्य, कोणत्याही __________ भारताच्या राज्यक्षेत्रातं कायद्यापुढे समानता अथवा कायद्याचे संरक्षण नाकारणार नाही.

(1) व्यक्तीस (2) नागरिकास (3) गटास (4) धर्मास

---

15. __________ या निकषानुसार अल्पसंख्यांक असलेल्या सर्व वर्गांना आपल्या पसंतीच्या शैक्षणिक संस्था स्थापण्याचा व त्यांचे प्रशासन करण्याचा हक्क असेल.

(1) धर्म (2) वंश (3) जात (4) धर्म किंवा भाषा

---

16. भारतीय संविधानाच्या अनुच्छेद 42 अन्वये राज्य हे कामाबाबत न्याय्य व मानवीय परिस्थिती निर्माण करण्यासाठी व __________ सहाय्यासाठी तरतूद करील.

(1) आर्थिक
(2) प्रसूतिविषयक
(3) न्यायिक
(4) वरीलपैकी कोणतेही नाही

---

17. कोणत्याही अपराधाचा आरोप असलेल्या कोणत्याही व्यक्तीवर स्वत:विरूद्ध साक्षीदार होण्याची __________.

(1) सक्ती करता येते
(2) सक्ती केली जाणार नाही
(3) न्यायालय आदेश देऊ शकते
(4) यापैकी नाही

---

**कच्च्या कामासाठी जागा**



www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial

**18.** एकाच अपराधाबद्दल एकापेक्षा अधिक वेळा कोणत्याही व्यक्तिवर खटला चालवला जाणार नाही आणि तिला शिक्षा दिली जाणार नाही ही बाब भारताचे संविधान अनुच्छेद 20 (2) मध्ये नमूद केली आहे. याबाबत खालीलपैकी योग्य पर्याय निवडा :

(1) उपरोक्त विधान चूक आहे

(2) विधान बरोबर आहे परंतु अनुच्छेद चूक आहे.

(3) अनुच्छेद बरोबर आहे परंतु विधान चूक आहे

(4) उपरोक्त विधान व अनुच्छेद योग्य आहे.

---

**19.** जनतेचे पोषणमान व राहणीमान उंचावणे आणि सार्वजनिक आरोग्य सुधारणे या बाबी भारतीय संविधानाच्या अनुच्छेद 47 अन्वये ________ प्राथमिक कर्तव्य आहे.

(1) केंद्राचे (2) न्यायालयाचे (3) केंद्र आणि राज्याचे (4) राज्याचे

---

**20.** माणसांचा अपव्यवहार आणि वेठबिगारी यांना मनाई करणारा हक्क कोणता हक्क आहे ?

(1) भाषण स्वातंत्र्याचा हक्क (2) पर्याय क्र. (3) व (4)

(3) समानतेचा हक्क (4) शोषणाविरूध्द हक्क

---

**21.** ज्या व्यक्तिला अटक करून हवालात स्थानबध्द केले आहे, अशा व्यक्तिस अटकेच्या ठिकाणापासून सर्वात जवळच्या दंडाधिकाऱ्यापुढे हजर करण्याचा कालावधी किती ?

(1) प्रवासाच्या कालावधीसह 36 तास

(2) एकूण 24 तास

(3) 48 तास

(4) अटकेच्या ठिकाणापासून सर्वात जवळच्या दंडाधिकाऱ्याच्या न्यायालयापर्यंतच्या प्रवासास आवश्यक असलेला अवधी वगळून अटकेपासून 24 तास.

---

**22.** भारताच्या संविधानात नमूद केलेली मुलभूत कर्तव्ये किती आहेत ?

(1) 11 (2) 12 (3) 10 (4) 13

---

**कच्च्या कामासाठी जागा**

www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial

23. खालीलपैकी योग्य वाक्य निवडा :

(a) राज्य धोरणांची निदेशक तत्वे न्यायालयावर बंधनकारक आहेत.

(b) राज्य धोरणांची निदेशक तत्वे न्यायालयाकरवी अंमलबजावणी योग्य असणार नाहीत.

**पर्यायी उत्तरे :**

(1) उपरोक्त दोन्ही चूक
(2) उपरोक्त पैकी (a) बरोबर, (b) चूक
(3) उपरोक्त पैकी (a) चूक, (b) बरोबर
(4) उपरोक्त दोन्ही बरोबर

---

24. राष्ट्रीय महत्वाची स्मारके व स्थाने आणि वस्तू यांच्या संरक्षणाची जबाबदारी ________ आहे.

(1) केंद्राची
(2) राज्याची
(3) केंद्र आणि राज्य दोहोंची
(4) यापैकी नाही

---

25. माता-पित्याने किंवा पालकाने ________ आपल्या अपत्य किंवा पाल्यास शिक्षणाच्या संधी देणे हे मुलभूत कर्तव्य आहे.

(1) सहा वर्षापर्यंतच्या
(2) सहा ते चौदा वर्षापर्यंतच्या
(3) अठरा वर्षापर्यंतच्या
(4) एकवीस वर्षापर्यंतच्या

---

26. म.ना.से. (सेवेच्या सर्वसाधारण शर्ती) नियमातील तरतूदीनुसार प्रत्येक कार्यालय प्रमुखाने त्याच्या प्रशासकीय नियंत्रणाखालील शासकीय कर्मचाऱ्यांना प्रत्येक आर्थिक वर्षात सेवा पुस्तके दाखविणे व त्यांची सही घेणे आवश्यक आहे. मागील वित्तीय वर्षात याअनुषंगाने केलेली कार्यवाही कार्यालय प्रमुखाने दरवर्षी कोणत्या महिन्यात त्याच्या वरीष्ठ अधिकाऱ्यास सादर करणे आवश्यक आहे ?

(1) मे
(2) जुलै
(3) जानेवारी
(4) सप्टेंबर

---

27. श्रीमती परांजपे यांची नियुक्ती करण्याचे अधिकार विभागप्रमुख म्हणून विभागीय आयुक्त, नागपूर यांना आहेत. श्रीमती परांजपे यांनी चार वर्षानंतर जन्मतारखेत दुरुस्ती करण्याची विनंती केली असता, अशी दुरुस्ती करण्याचे अधिकार कोणास आहेत ?

(1) जिल्हाधिकारी, नागपूर
(2) विभागीय आयुक्त, नागपूर
(3) महसूल व वन विभाग
(4) वरीलपैकी नाही

---

**कच्च्या कामासाठी जागा**

P.T.O.

www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial

**28.** श्री. महेश, कक्ष अधिकारी, मंत्रालय यांनी त्यांच्या मुळ गावी त्यांचे चिरंजीव श्री. कार्तिक याच्या नावे 'क्रिकेट चषक' स्पर्धा आयोजित केली त्यांची ही कृती :

(1) वर्तणूक नियमाचा भंग करणारी आहे.
(2) वर्तणूक नियमाचा भंग करणारी नाही.
(3) शासनाची कार्योत्तर मान्यता घ्यावी.
(4) वरीलपैकी कोणताही पर्याय योग्य नाही.

---

**29.** कमी वेतन असलेल्या पदावरील बदली केंव्हा अनुज्ञेय असते ?

(1) गैरवर्तणूक
(2) लेखी विनंती
(3) वरीलपैकी दोन्ही प्रकरणी
(4) वरील एकही नाही

---

**30.** श्री. परमानंद, दीर्घ सुटी विभागात काम करणारे अधिकारी, यांना दीर्घ सुटी रजेच्या अगोदर जोडून घेण्यास परवानगी देण्यात आली आहे, अशा स्थितीत त्यांनी कार्यभार कसा सोपवावा ?

(1) रजेवर जाण्यापूर्वी, रजा ज्या तारखेपासून सुरू होत आहे त्या तारखेपासून कार्यभार सोपविण्याच्या प्रतिवेदनावर सही करावी.

(2) सुट्टीच्या कालावधीत कार्यभार सोपवावा.

(3) रजेवरून आल्यानंतर कार्यभार सोपविण्याच्या प्रतिवेदनावर सही करावी.

(4) रजा कालावधीत कार्यभार सोपवावा.

---

**31.** (अ) श्रीमती कुलकर्णी यांचे दोन वर्षाहून अधिक कालावधीकरिता सतत वेतन जप्त होत आहे.

(ब) श्रीमती कुलकर्णी यांची कर्जबाजारी किंवा नादारी परिस्थिती सवयीमधून उद्भवलेल्या परिस्थितीच्या परिणामी झालेली नाही हे सिध्द करण्याची जबाबदारी श्रीमती कुलकर्णी यांच्यावर आहे.

याबाबतीत खालीलपैकी कोणता पर्याय **योग्य** आहे ?

(1) (अ) अनुषंगाने (ब) बरोबर आहे
(2) (अ) अनुषंगाने 'ब' चूक आहे
(3) (ब) अनुषंगाने (अ) चूक आहे
(4) यापैकी कोणताही नाही

---

**कच्च्या कामासाठी जागा**

www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial

32. "शासकीय कर्मचारी" याचा अर्थ :

(अ) राज्याच्या कामकाजासंबंधातील नागरी सेवेतील कर्मचारी.

(ब) ज्यांच्या सेवा, राज्याच्या एकत्रित निधीव्यतिरिक्त अन्य मार्गाने वेतन काढण्यात येणाऱ्या महामंडळाकडे सोपविल्या असतील असे कर्मचारी.

(1) (अ) व (ब) बरोबर
(2) (अ) व (ब) यापैकी कोणताही नाही
(3) (अ) बरोबर (ब) चूक
(4) (ब) बरोबर (अ) चूक

---

33. म.ना.से. (वर्तणूक) नियम 1979 मधील नियमांचा अर्थ लावण्याच्या संबंधात कोणताही प्रश्न उपस्थित झाल्यास त्यावर अंतिम निर्णय कोणाचा असेल ?

(1) महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण (MAT)
(2) उच्च न्यायालय
(3) लोक आयुक्त
(4) महाराष्ट्र शासन

---

34. म.ना.से (वर्तणूक) नियम 1979 मधील तरतूदीनुसार विवाह, वर्षदिन, अंत्यसंस्कार किंवा धार्मिक समारंभावेळी जवळच्या नातेवाईकाकडून स्वीकारावयाच्या देणगीची रक्कम गट ब च्या कर्मचाऱ्याच्या बाबतीत रु. ________ पेक्षा जास्त असल्यास शासनास कळविणे आवश्यक आहे.

(1) 2000
(2) 3000
(3) 4000
(4) 5000

---

35. खालील विधानांपैकी **योग्य** विधान कोणते ?

महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम 1979 नुसार :

(अ) शासकीय कर्मचाऱ्यास रोखे, शेअर्स किंवा इतर गुंतवणूकीत पैसे गुंतवता येत नाहीत.

(ब) शेअर्स, रोखे व इतर गुंतवणूकांची वारंवार खरेदी व विक्री करणे सट्टा समजण्यात येतो.

(1) (अ) बरोबर (ब) चूक
(2) दोन्ही (अ) व (ब) बरोबर
(3) (अ) चूक (ब) बरोबर
(4) दोन्ही (अ) व (ब) चूक

---

36. खालील विधाने पहा :

(अ) शासकीय कर्मचारी कोणत्याही स्थायी पदावर नियुक्त झाला असल्यास तो त्या पदाचा धारणाधिकार संपादित करतो.

(ब) एका पदाचा धारणाधिकार संपादित झाल्यास त्याने पूर्वी संपादिलेला धारणाधिकार संपुष्टात येतो.

यापैकी **योग्य** विधान/विधाने कोणती ?

(1) फक्त (अ)
(2) (अ) व (ब)
(3) फक्त (ब)
(4) यापैकी नाही

---

**कच्च्या कामासाठी जागा**

**P.T.O.**

www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial

37. सेवा पुस्तकाच्या प्रारंभिक पृष्ठावर कोणत्या नोंदीचा समावेश असत नाही ?

(1) नियुक्तीची तारीख
(2) शासकीय कर्मचाऱ्याची सही
(3) शैक्षणिक पात्रता
(4) जन्मतारीख

38. शासकीय कर्मचाऱ्यांच्या संबंधात "कुंटूबीय" यामध्ये कोणाचा समावेश आहे ?

(1) कर्मचाऱ्याची पत्नी/पती
(2) संपूर्णत: अवलंबून असणारा सावत्र मुलगा/मुलगी
(3) कर्मचाऱ्यावर पूर्णपणे अवलंबून असणारे सासु/सासरे
(4) वरील सर्व

39. सर्वसाधारणपणे कोणत्या बाबीची नोंद सेवा पुस्तकात घेण्यात येत नाही ?

(1) वैयक्तिक चारित्र्य प्रमाणपत्र
(2) जन्म दिनांक नोंद
(3) वैद्यकीय तपासणी
(4) पदोन्नती

40. शासकीय कर्मचाऱ्यास शासनाच्या पूर्वमंजूरीने :

(a) सेवानिवृत्तीनंतर करावयाच्या वाणिज्यिक नोकरीसंबंधात वाटाघाटी करता येतील.
(b) सार्वजनिक संस्थेकरिता केलेल्या कामासाठी फी स्वीकारता येईल.

वरील विधानांपैकी **योग्य** विधान/विधाने कोणती ?

(1) (a) व (b)
(2) (a) व (b) दोन्ही नाहीत
(3) फक्त (a)
(4) फक्त (b)

41. राज्याच्या 'एकत्रित निधी' संदर्भात कोणते विधान **अयोग्य** आहे ?

(1) राज्य शासनास प्राप्त झालेल्या महसूलाच्या सर्व रकमा
(2) शासनास प्राप्त झालेल्या महसूलाच्या काही रकमा
(3) राजकोष पत्रांच्या द्वारे उभारलेली सर्व कर्जे
(4) अर्थोपाय आगाऊ रकमा

**कच्च्या कामासाठी जागा**

www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial

42. शासकीय सेवेत आलेल्या उमेदवाराची तपासणी करणाऱ्या वैद्यकीय अधिकाऱ्याने नेत्रदोषा व्यतिरिक्त कोणत्याही विकलांगतेच्या कारणावरुन उमेदवारास अपात्र ठरविल्यास कार्यालय प्रमुखाच्या विनंतीवरुन, उमेदवाराच्या कार्यक्षमतेच्या ती आड येण्याची शक्यता नाही असे म्हणून अशी विकलांगता माफ करण्याचा स्वेच्छाधिकार म.ना से (सेवेच्या सर्वसाधारण शर्ती) नियम 1981 नुसार कोणास आहे ?

(1) विभागीय आयुक्त (2) संचालक, आरोग्य सेवा

(3) जिल्हा आरोग्य अधिकारी (4) यापैकी कोणालाही नाही

43. खालील विधाने तपासा :

(अ) एका कार्यालयातून दुसऱ्या कार्यालयात बदली झालेल्या अराजपत्रित कर्मचाऱ्याच्या सेवा पुस्तकात झालेल्या बदलीचे स्वरूप व कारणे नोंदविणे आवश्यक आहे.

(ब) जेथून बदली झाली त्या कार्यालय प्रमुखाने अशा कर्मचाऱ्याच्या सेवा पुस्तकात अद्यावत नोंदी करुन ते जेथे बदली झाली तेथील कार्यालय प्रमुखास पाठविले पाहीजे.

(क) नवीन कार्यालयास सेवापुस्तक स्वीकारण्यापूर्वी त्यात चूक आढळल्यास ती चूक दुरुस्त करण्यासाठी सेवा पुस्तक त्या संबंधित शासकीय कर्मचाऱ्यामार्फत मुळ कार्यालयास पाठवावे.

यापैकी **अचूक** विधाने कोणती ?

**पर्यायी उत्तरे :**

(1) (अ), (ब) (2) (क) (3) (अ), (ब) व (क) (4) (ब) व (क)

44. म.ना.से. (सेवेच्या सर्वसाधारण शर्ती) नियम 1981 नुसार 'दिवस' म्हणजे________.

(1) सकाळी 6.00 ते संध्याकाळी 6.00 पर्यंतचा कालावधी

(2) सकाळी 9.30 ते संध्याकाळी 5.30 पर्यंतचा कालावधी

(3) एका मध्यरात्रीपासून सुरू होऊन दुसऱ्या मध्यरात्री संपणारा कालावधी

(4) सकाळी 9.55 ते संध्याकाळी 5.30 पर्यंतचा कालावधी

कच्च्या कामासाठी जागा

P.T.O.

www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial

45. श्रीमती देवयानी खोब्रागडे प्रकरणामध्ये शासनाच्या सामान्य प्रशासन विभागातील कर्मचारी याने 'दूरदर्शन' वरून प्रसारीत होणाऱ्या कार्यक्रमामध्ये अमेरिकन प्रशासनावर टीका केली. शासकीय कर्मचारी याची वरील कृती :

(1) योग्य आहे.

(2) म.ना से (वर्तणूक) नियमाचा भंग आहे.

(3) अशी कृती करण्यापूर्वी शासनाची परवानगी घेणे आवश्यक होते.

(4) शासनाची कार्योत्तर मंजुरी घेणे आवश्यक होते.

---

46. सेवापुस्तकात जन्मतारखेची नोंद करताना, ज्याचे फक्त जन्मवर्ष माहित आहे पण तारीख माहित नाही अशा शासकीय कर्मचाऱ्यांच्या बाबतीत ________ ही जन्मतारीख मानण्यात यावी.

(1) 1 जुलै (2) 1 जानेवारी (3) 30 जून (4) 30 जुलै

---

47. श्री. अनिल, शाखा अभियंता यांनी गडचिरोली ते मुंबई हा प्रवास वैयक्तिक सामानासह केला, त्यांना मुंबई येथे रूजू होण्यास तीन दिवसाचा कालावधी असल्याने बुलढाणा येथील हॉटेलमध्ये वास्तव्य केले, प्रवासामध्ये काचसामान फुटले त्यांनी मागणी केलेल्या प्रवास खर्चामध्ये कोणता खर्च अनुज्ञेय असेल ?

(1) बुलढाणा येथील हॉटेलचे बील (2) वैयक्तिक सामानसह केलेला प्रवासखर्च

(3) काचसामानाची प्रतिपूर्ती खर्च (4) वरीलपैकी कोणतेही नाही

---

48. शासकीय कर्मचारी सेवानिवृत्त झाल्यानंतर त्याने राजीनामा दिल्यानंतर किंवा त्याला कार्यमुक्त करण्यात आल्यानंतर त्याचे सेवापुस्तक किंवा सेवापट ________.

(1) त्या कर्मचाऱ्याकडे सोपविण्यात यावे (2) त्याला परत करण्यात येऊ नये

(3) त्याच्या सहकाऱ्याकडे द्यावे (4) 'ड' वर्ग दफ्तरीदाखल करावे

---

49. म.ना.से. (वर्तणूक) नियम 1979 मधील तरतूदीनुसार शासन एकावेळी प्रत्येक वर्गाच्या संबंधात ________ संघटनेला मान्यता देऊ शकेल.

(1) 2 (2) 1 (3) 3 (4) 4

---

50. अराजपत्रित शासकीय कर्मचाऱ्यांच्या सेवा पुस्तकामध्ये सुरूवातीला नोंद केलेल्या जन्मतारखेत दुरुस्ती करण्याचे अधिकार कोणाला आहेत ?

(1) विभाग प्रमुख (2) कार्यालय प्रमुख (3) प्रभारी मंत्री (4) प्रभारी राज्यमंत्री

---

**कच्च्या कामासाठी जागा**

www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial

**51.** खालील विधाने पहा :

(अ) 'अ' या अनुसूचित जमाती प्रवर्गातील कर्मचाऱ्याने त्यास पदोन्नतीचा लाभ नियमानुसार मिळत नसल्याबाबतची तक्रार आदिवासी विकास विभागाच्या प्रभारी मंत्री महोदयांकडे केली.

(ब) 'ब' या शासकीय कर्मचाऱ्याने वेतनवाढ मिळण्यासाठी राज्याच्या वित्त विभागाच्या प्रभारी मंत्री महोदयांची शिफारस त्याच्या प्रशासकीय विभागास सादर केली.

महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम 1979 अन्वये वरीलपैकी कोणते वर्तन नियमबाह्य आहे?

**पर्यायी उत्तरे :**

(1) (अ) (2) (अ) व (ब) (3) (ब) (4) वरील पैकी कोणतेही नाही

---

**52.** स्वीयेतर सेवा कालावधीतील नोंदी साक्षांकित करण्याचे अधिकार कोणास आहेत?

(1) कार्यालय प्रमुख (2) विभाग प्रमुख (3) नियुक्ती प्राधिकारी (4) लेखापरीक्षा अधिकारी

---

**53.** महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम 1979 यात एकूण किती नियम समाविष्ट आहेत?

(1) 27 (2) 33 (3) 37 (4) 34

---

**54.** (अ) वर्ग 2 च्या कर्मचाऱ्याच्या निरोप समारंभासाठी वर्ग 3 व 4 च्या कर्मचाऱ्यांकडून वर्गणी वसूल करण्यात आली.

(ब) 'अ' या सेवा निवृत्त होणाऱ्या कर्मचाऱ्यास औपचारिक निरोप समारंभ आयोजित करण्यात आला.

(क) सार्वजनिक मंडळाकडून आयोजित मनोरंजनाच्या साध्या कार्यक्रमास शासकीय कर्मचारी हजर राहीला.

महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम 1979 नुसार **योग्य** बाब कोणती?

(1) (अ) (2) (ब) (3) (क) (4) वरील सर्व

---

**55.** ध्वजदिन निधी प्रसंगात श्री. जांभळे शासकीय कर्मचारी , यांनी रु. 1 लक्ष इतका निधी संकलित करुन संबंधिताकडे सूपूर्द केला त्यांची कृती म.ना.से वर्तणूक नियमाचा भंग करणारी आहे काय?

(1) होय (2) नाही

(3) निश्चित सांगता येणार नाही (4) वरीलपैकी एकही नाही

---

**कच्च्या कामासाठी जागा**



www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial

56. शासनाच्या दि. 11 एप्रिल 2008 च्या अधिसूचनेनुसार विवाह, वर्षदिन अंत्यसंस्कार किंवा धार्मिक समारंभ वगळून इतर कोणत्याही बाबतीत गट 'अ' मधील शासकीय कर्मचाऱ्यास खालील मूल्यापेक्षा अधिक मूल्य असलेली देणगी, शासनाची मंजूरी मिळाल्याखेरीज स्वीकारता येत नाही.

(1) रु. 500 (2) रु. 7000 (3) रु. 1000 (4) रु. 5000

---

57. म.ना.से (वर्तणूक) नियम 1979 मधील तरतूदीनुसार शासकीय कर्मचारी स्वत: किंवा त्याच्या कुटुंबातील कोणत्याही व्यक्तीमार्फत किंवा त्याच्या वतीने कोणत्याही व्यक्तीमार्फत त्याचे घरगुती किंवा इतर कोणतेही काम करण्यासाठी _________ वर्षाखालील मुलांना नोकरीस ठेवणार नाही किंवा नोकरीस ठेवण्यास परवानगी देणार नाही.

(1) 19 (2) 16 (3) 14 (4) 21

---

58. म.ना.से. (वर्तणूक) नियम 1979 नुसार :

खालील विधानांपैकी **अचूक** विधान/विधाने कोणती ?

(अ) शासकीय कर्मचाऱ्यास त्याच्या नोकरीशी किंवा अन्य कोणत्याही शासकीय कर्मचाऱ्याच्या नोकरीशी संबंधित असणाऱ्या कोणत्याही बाबी संबंधात संप करता येत नाही.

(ब) ज्या संघटनेची उद्दिष्टये भारताच्या सार्वभौमत्वाला आणि एकात्मतेला किंवा सुव्यवस्थेला किंवा नैतिक मुल्यांना बाधक असतात अशा संघटनेचे सदस्यत्व शासकीय कर्मचाऱ्यास स्वीकारता येत नाही.

(1) (अ) व (ब) (2) केवळ (ब)

(3) केवळ (अ) (4) दोन्ही अयोग्य

---

59. सेवापुस्तकांची पडताळणी करणे याबाबत कोणते विधान बरोबर आहे ?

(अ) सेवा पुस्तकाची पडताळणी कक्ष प्रमुखाने मे महिन्यात करावी.

(ब) सर्व नोंदी बरोबर असल्याची खात्री पटल्यानंतर कार्यालय प्रमुख अशा आशयाचे प्रमाणपत्र सेवा पुस्तकात नोंदवील.

**पर्यायी उत्तरे :**

(1) (अ) व (ब) (2) फक्त (ब) (3) फक्त (अ) (4) कोणतेही नाही

---

**कच्च्या कामासाठी जागा**

www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial

60. महाराष्ट्र वन सेवा यातील पदावर निवड करण्यात आलेल्या उमेदवारांची वैद्यकीय तपासणी कोणाकडून करणे आवश्यक आहे ?

(1) मुंबई शहरातील वैद्यकीय मंडळ (2) जिल्हा शल्यचिकित्सक

(3) गडचिरोली येथील वैद्यकीय मंडळ (4) यापेक्षा वेगळे

---

61. श्री. बनकर, यांनी शासनाच्या पूर्वमंजूरीने दाखल केलेल्या प्रकरणामध्ये न्यायालयाने अब्रुनुकसानीचा दावा मान्य करताना रु. 25000 नुकसानभरपाई देण्याचा निवाडा पारित केला या निवाड्यासाठी शासनास रु. 22000 खर्च आला अशा स्थितीत श्री. बनकर म.ना.से (वर्तणूक) नियम 1979 अन्वये श्री. बनकर यांना किती रक्कम स्वत: कडे ठेवता येईल ?

(1) रु. 25000 (2) रु. 22000 (3) रु. 3000 (4) यापैकी काही नाही

---

62. 'जंगम मालमत्ता' या संज्ञेमध्ये यांचा समावेश होतो.

(1) ऋणपत्रे (2) विमापत्र (3) रोखे (4) वरील सर्व

---

63. 'स्थावर व जंगम मालमत्ता' विवरण पत्र सादर करण्यासंदर्भात गट 'क' पद धारण करणाऱ्या शासकीय कर्मचारी याचे बाबतीत विहित प्राधिकरण कोण आहे ?

(1) कार्यालय प्रमुख (2) विभाग प्रमुख (3) शासन (4) वरील कोणतेही नाही

---

64. एक स्वतंत्र घटक म्हणून मंजूर केलेली एखाद्या सेवेतील अथवा एखाद्या सेवेच्या भागातील पदसंख्या म्हणजे :

(1) पदांचा समुच्चय (2) अनेक घटकांचा समुच्चय

(3) संवर्ग (4) अनेक पदांची विभागणी

---

65. म.ना.से (वर्तणूक) नियम 1979 मधील तरतूदीनुसार शासकीय कर्मचाऱ्यांच्या (औद्योगिकेतर) संघटनेला मान्यता देण्याकरीता असलेल्या शर्तीनुसार संबंधित संघटना ज्या वर्गाचे प्रतिनिधित्व करते त्या वर्गातील शासकीय औद्योगिकेतर कर्मचाऱ्यांच्या एकूण संख्येपैकी किमान _________ टक्के कर्मचारी अशा संघटनेचे सदस्य असले पाहिजेत.

(1) 10 (2) 15 (3) 20 (4) 25

---

**कच्च्या कामासाठी जागा**



www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial

66. (अ) श्री. देशमुख, उपजिल्हाधिकारी तथा पीठासीन अधिकारी, महसूल न्यायाधिकरण यांना, न्यायाधिकरणापुढील शेतजमीन प्रकरणामध्ये अर्जदाराने लवाद नेमण्याची मागणी केली.

(ब) श्री. देशमुख यांनी मागणी मंजूर करुन स्वत:च लवाद म्हणून काम पाहिले या प्रकरणामध्ये कोणता पर्याय अचूक आहे ?

(1) 'अ' व 'ब' कृती नियमानुसार योग्य आहे.

(2) 'अ' कृती योग्य असून 'ब' कृती नियमानुसार अयोग्य आहे.

(3) 'अ' व 'ब' कृती नियमानुसार अयोग्य आहे.

(4) 'अ' कृती अयोग्य असून 'ब' कृती योग्य आहे.

---

67. म.ना.से (वर्तणूक) नियम 1979 मधील नियम 2, 3, 5, 6, 11, 15, 19, 29, व 30 या व्यतिरिक्त इतर तरतूदी कोणत्या सेवेतील कर्मचाऱ्यांस लागू नाहीत ?

(1) शासन सेवेतील वैद्यकीय अधिकारी

(2) शासकीय शल्य चिकित्सक

(3) ग्राम पोलिस अधिनियम 1967 अन्वये नियुक्त केलेले पोलिस पाटील

(4) तलाठी

---

68. म.ना.से. (सेवेच्या सर्वसाधारण शर्ती) नियम 1981 हे कोणत्या विभागाचे प्रकाशन आहे ?

(1) वित्त विभाग (2) सामान्य प्रशासन विभाग

(3) सामाजिक न्याय विभाग (4) विधी व न्याय विभाग

---

69. श्री. अशोक, धारणी जि. अमरावती यांनी सेवेत प्रवेश करताना, दाखल केलेल्या जन्म दाखल्यात वर्ष आणि महिन्याचा उल्लेख आहे परंतू नेमक्या तारखेचा उल्लेख नाही अशा प्रसंगी त्यांच्या सेवा पुस्तकात कोणती तारीख जन्मतारीख म्हणून नोंद करण्यात येईल ?

(1) 1 (2) 16 (3) 02 (4) 30

---

70. म.ना.से. (सेवेच्या सर्वसाधारण शर्ती) नियमानुसार शासकीय कर्मचाऱ्यास विशेष जिकरीच्या स्वरूपाचे कर्तव्य व कामामध्ये किंवा जबाबदारीमध्ये विशिष्ट वाढ याबाबींचा विचार करून एखाद्या पदाचा अथवा शासकीय कर्मचाऱ्याच्या वित्तलब्धीमध्ये वेतनाच्या स्वरूपात दिलेल्या वाढीस काय महणतात ?

(1) निवड श्रेणी (2) विशेष वेतन (3) कायमपद वेतन (4) समयश्रेणी वेतन

---

**कच्च्या कामासाठी जागा**

www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial

71. म.ना.से (वर्तणूक) नियम 1979 मधील नियम ________ अनुसार मान्यताप्राप्त नसलेल्या कोणत्याही संघटनेला शासकीय कर्मचाऱ्यांशी किंवा अशा कर्मचाऱ्यांच्या वर्गाशी संबंधित कोणत्याही बाबींच्या संबंधात कोणतेही अभिवेदन किंवा विज्ञापन सादर करण्याचा किंवा शिष्टमंडळ पाठविण्याचा हक्क असणार नाही ?

(1) 29 (2) 30 (3) 31 (4) 32

---

72. शासकीय कर्मचाऱ्यांची शासकीय सेवा त्यांच्या नियुक्तीनंतर सहा महिन्यापेक्षा अधिक कालावधीकरिता चालू रहाण्याची अपेक्षा असल्यास सेवेत रूजू झाल्याच्या तारखेपासुन किती कालावधीत पात्रतेसंदर्भातील वैद्यकिय प्रमाणपत्र सादर करणे बाबत कार्यालय प्रमुखाने सांगितले पाहिजे ?

(1) एक महिना (2) तीन महिने (3) दोन महिने (4) सहा महिने

---

73. ज्या सेवेतील शासकीय कर्मचाऱ्याला भारताच्या किंवा संघराज्यक्षेत्राच्या एकत्रित निधी व्यतिरिक्त अन्य कोणत्याही उत्पन्नाच्या संसाधनांतून शासनाच्या मंजुरीने वेतन मिळते त्या सेवेस ________ म्हणतात.

(1) परीविक्षाधीन सेवा (2) स्वीयेतर सेवा (3) नागरी सेवा (4) यापैकी नाही

---

74. श्री. परब, हे शासकीय कर्मचारी यांचे पती असून त्यांना वारसाहक्काने रु. पाच लक्ष मिळाले आहेत. श्री. परब यांनी या रकमेतून त्यांचे नावे वाहन खरेदी केली आहे अशा स्थितीत कोणता पर्याय **योग्य** आहे ?

(1) श्रीमती परब यांनी विहित प्राधिकरणाची मंजूरी प्राप्त करुन घेणे आवश्यक आहे.

(2) श्रीमती परब यांनी पूर्वमान्यता घेतली नसल्याने त्या विभागीय चौकशीस पात्र आहेत.

(3) श्री. परब यांनी श्रीमती परब यांच्यामार्फत शासनास कळविणे आवश्यक आहे.

(4) श्री. परब यांनी केलेला व्यवहार शासकीय कर्मचाऱ्याच्या कुटूंबियांनी केलेला मानण्यात येणार नाही.

---

75. श्री. संजय, पोलीस उपनिरीक्षक, औरंगाबाद यांची बदली झाली असून त्यांनी मुख्यालयाखेरीज अन्य ठिकाणी कार्यभार सोपविण्याची परवानगी मागितली. अशी परवानगी देण्याचा अधिकार कोणास आहे ?

(1) पोलीस निरीक्षक (2) पोलीस उपअधीक्षक

(3) पोलीस उपमहानिरीक्षक (4) पोलीस स्टेशन

---

**कच्च्या कामासाठी जागा**



www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial

## विभाग 'ब'

76. दैनंदिनीमध्ये नोंद करण्याची आवश्यकता नसलेल्या आवकपत्रांचे प्रकारासंदर्भात खालीलपैकी योग्य काय आहे?
    (1) तारांच्या हवालप्रती
    (2) सर्वसाधारण माहितीकरिताची परिपत्रके
    (3) सुट्ट्यांची यादी
    (4) वरील सर्व

77. प्राथम्यक्रमाच्या खुणचिठ्ठयांची आवश्यकता संपल्यावर त्या काढून टाकल्या आहेत याची खबरदारी व खात्री कोणी करावयाची आहे?
    (1) कार्यासन अधिकारी
    (2) अवर सचिव
    (3) टिप्पणी सहायक
    (4) उप सचिव

78. शासकीय विधेयकाचा मसुदा परिनिरीक्षणासाठी कोणत्या विभागाकडे संबंधित फायलीसह पाठविण्यात येतो?
    (1) वित्त विभाग
    (2) सामान्य प्रशासन विभाग
    (3) नियोजन विभाग
    (4) विधी व न्याय विभाग

79. शासन कार्यनियमावलीच्या कोणत्या नियमानुसार राज्य शासनाच्या प्रत्येक आदेश किंवा लेख यावर सचिव, उपसचिव, अवरसचिव किंवा या बाबतीत ज्यास विशेष अधिकार प्रदान करण्यात आले आहेत असा इतर अधिकारी यांनी सही केली पाहीजे ज्यानुसार त्यांचे योग्य अभिप्रमाणन असल्याचे मानले जाईल?
    (1) 11
    (2) 12
    (3) 13
    (4) 14

80. दिनांक 24 मार्च 2011 रोजी पंचायतराज संस्थांमध्ये महिलांना किती टक्के आरक्षण देण्याचा निर्णय महाराष्ट्र शासनाने घेतला आहे?
    (1) 20%
    (2) 30%
    (3) 40%
    (4) 50%

81. खालीलपैकी कोणत्या प्रकारच्या विधिमंडळ प्रश्नास 'अग्रक्रम' देऊन यथाशीघ्र त्या प्रश्नाचे उत्तर द्यावयाचे असते?
    (1) अल्पमुदतीचा सुचना प्रश्न
    (2) अतारांकित प्रश्न
    (3) तारांकित प्रश्न
    (4) अशासकीय ठराव

82. राजमाता जिजाऊ माता-बाल आरोग्य व पोषण मिशन चे महासंचालक कोण आहेत?
    (1) श्रीमती वंदना कृष्णा
    (2) श्रीमती मालिनी शंकर
    (3) श्रीमती मिना लोचन
    (4) श्रीयुत उज्वल उके

**कच्च्या कामासाठी जागा**

www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial

83. कोणाचे स्पष्ट आदेश असल्याखेरीज टिप्पणी सरकारी कागदपत्र समजले जाणार नाही ?

(1) कक्ष अधिकारी (2) शासन (3) टिप्पणी सहायक (4) अवरसचिव

---

84. महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम, 2005 अन्वये पुर्णत: एका विभागाशी संबंधीत प्रकरण असल्यास ________ दिवसांत निकाली काढणे आवश्यक आहे.

(1) 15 (2) 30 (3) 45 (4) 90

---

85. कोणत्या प्रकरणांना "तातडीचे" किंवा "तात्काळ" अशा कोणत्याही खुण चिठ्ठ्या लावण्याची आवश्यकता नाही ?

(1) विधानसभा व विधानपरिषद प्रश्न (2) विधानसभा व विधानपरिषद ठराव

(3) टंचाई प्राथम्य असलेल्या प्रकरणांना (4) वरील सर्व

---

86. यशवंत ग्रामसमृद्धी योजना महाराष्ट्र शासनाच्या कोणत्या विभागामार्फत राबविण्यात येते ?

(1) महसुल व वन विभाग (2) नियोजन विभाग

(3) रोजगार व स्वयंरोजगार विभाग (4) ग्रामविकास व जलसंधारण विभाग

---

87. मंत्रालयीन आस्थापनांमध्ये सेवा पुस्तके व रजा लेखे अद्यावत ठेवण्यात येत आहेत याकडे लक्ष पुरविण्याची जबाबदारी कोणावर आहे ?

(1) आस्थापना लिपिक (2) आस्थापना सहायक

(3) आस्थापना अवरसचिव (4) अतिरिक्त सचिव

---

88. राज्य शासनाने किंवा राज्य शासनातर्फे दिलेले सर्व आदेश किंवा निष्पादित केलेले सर्व लेख हे ________ यांच्या नावाने किंवा आदेशावरुन दिल्याचे किंवा निष्पादित केल्याचे समजण्यात येईल.

(1) मुख्यमंत्री (2) मुख्य सचिव (3) प्रभारी मंत्री (4) राज्यपाल

---

89. खाजगी व्यक्ती व संस्था, महामंडळे, आमदार, खासदार, इतर राज्ये इ. शी पत्रव्यवहार करताना ________ या पत्रव्यवहाराचा वापर करतात.

(1) कार्यालयीन आदेश (2) ज्ञापन (3) सर्वसाधारण पत्र (4) शासन निर्णय

---

**कच्च्या कामासाठी जागा**



www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial

**90.** अवर सचिवाने त्याच्या नियंत्रणाखालील कार्यासनाची तपशीलवार तिमाही निरीक्षणे कोणत्या महिन्यात करावयाची आहेत ?

(1) एप्रिल, ऑगस्ट, नोव्हेंबर, फेब्रुवारी
(2) जानेवारी, एप्रिल, जुलै, ऑक्टोबर
(3) जानेवारी, मे, ऑगस्ट, डिसेंबर
(4) जुलै, ऑक्टोबर, डिसेंबर, मार्च

---

**91.** वनांचे संरक्षण, अवैध वृक्षतोड, वनांतील अतिक्रमण, वणवा, अवैध चराई, इ. प्रतिबंध करण्यासाठी ग्रामीणांच्या सहभागातून वन व्यवस्थापन करण्यासाठी राज्य शासनाची नाविन्यपुर्ण योजना कोणती ?

(1) सामाजिक वनीकरण योजना
(2) संत तुकाराम वनग्राम योजना
(3) वन संरक्षण योजना
(4) वनवा प्रतिबंध योजना

---

**92.** कोणत्या प्रकारच्या आवेदनपत्रांना पोच देण्यात येऊ नये ?

(1) शासकीय कर्मचाऱ्याकडून थेट प्राप्त झालेली आवेदनपत्रे
(2) सर्वसाधारण लोकहिताच्या बाबीखेरीज इतर बाबी संदर्भात स्थानिक संस्थांकडून प्राप्त झालेली आवेदन पत्रे
(3) वरील एकही नाही
(4) वरील दोन्ही

---

**93.** माहितीचा अधिकार अधिनियम 2005 कोणत्या राज्यात लागू नाही ?

(1) बिहार
(2) हरियाणा
(3) हिमाचल प्रदेश
(4) जम्मू आणि काश्मिर

---

**94.** पारपत्र, नागरिकत्व या संबंधी विषय या विभागाच्या अधिनस्त आहे.

(1) सामान्य प्रशासन विभाग
(2) गृह विभाग
(3) नगर विकास विभाग
(4) गृहनिर्माण विभाग

---

**95.** मंत्रालयीन विभागांची सद्यस्थीतीत एकूण संख्या __________ आहे.

(1) 28
(2) 29
(3) 30
(4) 31

---

**96.** केंद्र शासनाने मार्च 1990 मध्ये "योजना आयोगाची" स्थापना केली. योजना आयोगाचे अध्यक्ष कोण असतात ?

(1) राष्ट्रपती
(2) पंतप्रधान
(3) सदस्यांमधून ज्येष्ठ सदस्य
(4) राष्ट्रपतीद्वारे नामनिर्देशित व्यक्ती

---

**कच्च्या कामासाठी जागा**

www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial

97. महाराष्ट्रात स्वतंत्र पशू व मत्स्य विद्यापिठाची स्थापना कोठे व केंव्हा करण्यात आली ?

(1) नागपूर, सन 1997 (2) नागपूर, सन 1998 (3) पूणे, सन 1997 (4) पूणे, सन 1998

98. रमाई आवास योजना महाराष्ट्र शासनाच्या कोणत्या विभागामार्फत राबविण्यात येते ?

(1) आदिवासी विकास विभाग (2) सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग
(3) गृहनिर्माण विभाग (4) सहकार, वस्त्रोद्योग व पणन विभाग

99. केंद्र सरकारशी पत्रव्यवहार करताना कोणास उद्देशुन पत्रे पाठविण्यात यावीत ?

(1) संबंधित मंत्री (2) संबंधित मंत्रालयाचे सचिव
(3) मानद सचिव (4) संचालन

100. एखाद्या नस्ती मधील सर्व विचाराधीन मुद्यांवरील कार्यवाही पुर्ण झाल्यावर सदर नस्ती बंद करण्याची कार्यपद्धती म्हणजे :

(1) वर्गीकरण (2) नोंदणीकरण (3) अभिलेखन (4) विषय

101. आदेश काढण्यापुर्वी मुख्यमंत्र्यांना पुढील प्रकारची प्रकरणे राज्यपालांना सादर केली पाहीजेत –

(a) अध्यादेश प्रख्यापित करणे आणि तो काढून घेणे या संबंधी प्रकरणे.
(b) मागासवर्गीयांच्या हिताला ज्यामूळे बाधा पोहचेल किंवा संभव असलेली प्रकरणे.

(1) (a) (2) (b) (3) (a) आणि (b) (4) (a) आणि (b) कोणतेही नाही

102. कोणाच्या आदेशाशिवाय कोणतीही गोपनीय किंवा गुप्त फाईल औपचारिक अथवा अनौपचारिकरित्या दुसऱ्या विभागास पाठवता कामा नये ?

(1) उपसचिव (2) सहसचिव (3) सचिव (4) अवरसचिव

103. एकाच मंत्र्याच्या नियंत्रणाखालील विविध विभागांमध्ये एखाद्या प्रश्नावर मतभेद झाला तर त्या प्रश्नावर निर्णय देण्याचे अधिकार कोणास आहेत ?

(1) संबंधित प्रभारी मंत्री (2) मुख्यमंत्री (3) उपमुख्यमंत्री (4) मुख्यसचिव

104. ''माहितीसाठी'', ''माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी'' प्रती पाठवावयाच्या असतात तेंव्हा कोणत्या प्रकारच्या पत्रव्यवहाराचा नमुना वापरण्यात येतो ?

(1) शीघ्र पत्र (2) कार्यालयीन आदेश (3) पृष्ठांकन (4) प्रसिद्धिपत्रक

**कच्च्या कामासाठी जागा**



www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial

**105.** कक्ष अधिकारी या पदाच्या कार्यात खालीलपैकी कोणत्या बाबीचा समावेश होत नाही ?

(1) कार्यासनावर पर्यवेक्षण (2) प्रकरणावर टिप्पणी लिहीणे

(3) प्रकरणाची तपासणी करणे (4) कार्यालयाचे पर्यवेक्षण करणे

---

**106.** निर्गम कार्यासनामध्ये कोणत्या शाखेचा समावेश होत नाही ?

(1) टंकलेखन शाखा (2) परीक्षा शाखा (3) जावक शाखा (4) गोपनीय शाखा

---

**107.** भारतीय संविधानाच्या अनुच्छेद __________ द्वारा प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून महाराष्ट्र शासन कार्यनियमावली तयार करण्यात आली आहे ?

(1) 165 (2) 166 (3) 265 (4) 266

---

**108.** केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम 2005 अन्वये प्रथम अपिलीय अधिकाऱ्यास दंड करण्याचे अधिकार नाहीत ?

(a) हे विधान खरे नाही.

(b) हे विधान अंशतः खरे नाही, कारण काही परीस्थितीत दंड करता येतो.

(c) हे विधान खरे आहे.

(d) दंड करता येतो परंतु किती ते अधिनियमात नमूद नाही.

**पर्यायी उत्तरे :**

(1) फक्त (a) बरोबर (2) फक्त (c) बरोबर (3) फक्त (b) बरोबर (4) फक्त (b) व (d) बरोबर

---

**109.** कार्यालयीन कामकाजात कोणत्याही प्रकरणांशी संबंधित अभिलेख, पूर्वोदाहरणे, नियम, विनियम, पुस्तके किंवा इतर संबंधित कागदपत्रे प्रस्तुत करण्याच्या व त्यांचा निर्देश करण्याच्या प्रक्रियेला काय म्हणतात ?

(1) संदर्भ देणे (2) नस्ती सादर करणे (3) दाखला देणे (4) पुरावा देणे

---

**110.** मंत्रिमंडळाची बैठक सामान्यत: खालील दिवशी घेण्यात येते :

(1) दर सोमवारी (2) दर मंगळवारी (3) दर बुधवारी (4) दर गुरुवारी

---

**111.** शासकीय अधिकाऱ्यांचे/कर्मचाऱ्याचे गोपनीय अहवाल त्यांची सेवा निवृत्ती कारणामुळे सेवा समाप्त होणाऱ्या तारखेपासून किती वर्षांच्या कालावधीसाठी जतन करण्यात यावेत अशा सूचना आहेत.

(1) 8 वर्षे (2) 10 वर्षे (3) 5 वर्षे (4) 15 वर्षे

---

**कच्च्या कामासाठी जागा**

www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial

**112.** राज्याच्या लेख्यासंबंधात लेखापरीक्षा अहवाल कोणत्या समिती पुढे मांडण्यात येतो ?

(1) विधानमंडळ समिती (2) सचिव समिती (3) मंत्रीमंडळ समिती (4) वरील एकही नाही

**113.** उच्चन्यायालय व महाराष्ट्र लोकसेवा आयोगास शासनाचे महत्वाचे आदेश पाठविण्यासाठी कोणत्या पत्र व्यवहाराचा वापर करण्यात येतो ?

(1) शासन निर्णय (2) परिपत्रक (3) साधे पत्र (4) पृष्ठांकन

**114.** महाराष्ट्र शासन कार्यनियमावलीच्या नियम ________ अन्वये शासनाच्या कामकाजासंबंधी अनुदेश देण्यात आले आहेत.

(1) 9 (2) 12 (3) 3 (4) 15

**115.** राज्यपाल कोणाच्या सल्ल्याने एखाद्या मंत्र्याकडे संबंधीत विभागाचे अथवा एका पेक्षा अधिक विभागाचे कामकाज वाटून देतात ?

(1) मुख्यमंत्री (2) मंत्रीमंडळ

(3) अध्यक्ष विधानसभा (4) मुख्य न्यायाधिश – उच्च न्यायालय

**116.** विधान परिषदेमध्ये कोणताही ठराव मांडताना सदस्यांना भाषणासाठी पंधरा मिनिटांपेक्षा जास्त वेळ देता येत नाही परंतु संबंधित प्रभारी मंत्र्यास नियम 104 नुसार किती वेळ दिला जाऊ शकतो ?

(1) तीस मिनिटे (2) दहा मिनिटे

(3) पंधरा मिनिटे (4) वरीलपैकी कोणतेही नाही

**117.** विधान परिषदेमध्ये सदस्याने सुचना उपस्थित केल्यावर त्याची निकड व महत्व पाहून सुचना दाखल करून घेण्याचे अधिकार कोणास असतात ?

(1) सचिव (2) सदस्य समिती (3) सभापती (4) अध्यक्ष

**118.** पुढीलपैकी कोणते काम अंदाज समितीचे नाही ?

(1) पुरक अनुदानांसाठी मागण्यांची छाणणी करणे.

(2) वित्तिय प्रश्नावर सरकारला सल्ला देणे.

(3) समितीस आवश्यक वाटेल अशा रितीने खर्चाच्या अंदाजाची तपशिलवार छाणणी करणे.

(4) वरील एकही नाही

**कच्च्या कामासाठी जागा**



www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial

**119.** संयुक्त समितीचा पदसिद्ध सदस्य म्हणून कोणास नियुक्त केले जाते ?

(1) संबंधित विभागाचा प्रभारी मंत्री
(2) संबंधित विभागाचा सचिव
(3) सभागृहाचे अध्यक्ष
(4) मुख्यमंत्री

**120.** निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या बाबींवर अल्पकालीन चर्चा उपस्थित करण्यासाठी किमान किती सदस्यांची स्वाक्षरी होणे आवश्यक आहे ?

(1) 3 (2) 4 (3) 2 (4) 5

**121.** विधानमंडळ कामकाजात प्रश्नांच्या विषया-संदर्भात खालीलपैकी कोणते विधान अचूक आहे ?

(a) भारताच्या कोणत्याही भागात क्षेत्राधिकार असलेल्या न्यायालयाच्या अभिनिर्णयाधीन असलेल्या बाबी संबंधाने कोणताही प्रश्न विचारता येणार नाही.

(b) केवळ राज्यातील कोणत्याही भागात क्षेत्राधिकार असलेल्या न्यायालयाच्या अभिनिर्णयाधीन असलेल्या बाबी संबंधाने कोणताही प्रश्न विचारता येईल.

**पर्यायी उत्तरे :**

(1) (a) बरोबर (b) चूक
(2) (a) व (b) बरोबर
(3) (a) व (b) चूक
(4) (a) चूक व (b) बरोबर

**122.** विधानसभेत शासकीय ठरावांच्या बाबतीत ________ दिवसांची नोटीस देणे आवश्यक आहे.

(1) 30 (2) 15 (3) 8 (4) 7

**123.** अध्यक्षांनी अन्यथा निर्देश दिले नसतील तर __________ इतक्या पूर्ण दिवसांची तारांकित प्रश्नासंबंधिची सूचना देण्यात येईल.

(1) 30 दिवस (2) 45 दिवस (3) 15 दिवस (4) यापैकी एकही नाही

**124.** अंदाज समितीमध्ये विधानसभा अध्यक्ष विधान सभेच्या किती सदस्यांना नामनिर्देशित करू शकतात ?

(1) 20 (2) 23 (3) 15 (4) 6

**125.** संयुक्त समितीत अनुसरावयाच्या कार्यपद्धतीचे विनियमन खालील नियमांद्वारे करण्यात येईल :

(1) विधानसभा नियम
(2) विधानपरिषद नियम
(3) विधानसभा व विधानपरिषद नियम एकत्रितपणे
(4) वरीलपैकी कोणतेही नाही

**कच्च्या कामासाठी जागा**

www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial

126. राज्याच्या विनियोजन लेख्यासंबंधातील भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या अहवालाचे परिनिरीक्षण करण्याचे काम खालीलपैकी कोणती समिती करते ?

(1) अंदाज समिती (2) पंचायतराज समिती (3) विशेषाधिकार समिती (4) वरील एकही नाही

127. मंत्र्यांनी सभागृहात दिलेली वचने व हमी यांची अंमलबजावणी त्या प्रयोजनासाठी आवश्यक असलेल्या किमान वेळेच्या आत करण्यात आली किंवा नाही, याबाबतचा अहवाल सादर करण्याचे काम कोणती समिती करते ?

(1) लोकलेखा समिती (2) अंदाज समिती
(3) सार्वजनिक उपक्रम समिती (4) वरील एकही नाही

128. विधानसभा आश्वासन समितीचे सदस्य किती काळ आपले पद धारण करतील ?

(1) एक वर्ष (2) पाच वर्षे
(3) आश्वासनांची पूर्तता होईपर्यंत (4) नवीन समितीची रचना करण्यात येईपर्यंत

129. शासकीय आश्वासन समितीमध्ये विधानसभा अध्यक्ष नामनिर्देशनाद्वारे किती सदस्यांची नेमणूक करू शकतात ?

(1) 15 (2) 20 (3) 19 (4) 11

130. विधान परिषदेचे सभापती लोकलेखा समितीमध्ये विधान परिषदेच्या किती सदस्यांची नामनिर्देशनाद्वारे नियुक्ती करू शकतात ?

(1) 10 (2) 7 (3) 12 (4) 5

131. राज्यसरकारने भारत सरकारशी केलेल्या पत्रव्यवहारासंबंधी वस्तुस्थिती जाणुन घेण्यासाठी प्रश्न विधान परिषदेत विचारावयाचा असल्यास त्यासाठीचे विवेचन __________ या नियमाद्वारे केलेले आहे.

(1) वि.प.नि. 90 (2) वि.प.नि. 80 (3) वि.प.नि. 67 (4) वि.प.नि. 57

132. विधान परिषद सदस्यास एका अधिवेशन कालावधीमध्ये किती ठरावांची सुचना पाठवण्यास परवानगी देता येऊ शकते ?

(1) दोन (2) तीन (3) चार (4) पाच

**कच्च्या कामासाठी जागा**

P.T.O.

www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial

**133.** अतारांकित प्रश्नासंदर्भात खालीलपैकी कोणते विधान चुकीचे आहे ?

(1) सभागृहात तोंडी उत्तर देण्यात येत नाही.

(2) प्रश्न व त्यांची उत्तरे पटलावर ठेवण्यात येतात.

(3) प्रश्नांची उत्तरे 30 दिवसांच्या आत देण्यात येतात.

(4) वरील पैकी एकही नाही.

---

**134.** विधान परिषदेमधील ज्या सरकारी ठरावाची सुचना मंत्री किंवा महाधिवक्ता यांनी दिली असेल तो ठराव मांडण्यासाठी किती दिवसांची सुचना देणे आवश्यक आहे ?

(1) सात दिवस (2) आठ दिवस (3) नऊ दिवस (4) दहा दिवस

---

**135.** एका दिवसाच्या कामकाजामध्ये एका सदस्याच्या नावावर असलेल्या ठरावांपैकी किती अशासकिय ठरावांचा समावेश केला जाऊ शकतो ?

(1) 5 (2) 4 (3) 3 (4) 1

---

**136.** जेव्हा विधानसभेमध्ये एखाद्या ठरावावर मतदान झाले असेल तेव्हा अशाच आशयाचा प्रश्न उपस्थित करणारा ठराव मतदान झाल्याच्या दिनांकापासून किती कालावधीपर्यंत मांडता येत नाही ?

(1) सहा महिने (2) एक वर्ष (3) दोन वर्ष (4) एक वर्ष सहा महिने

---

**137.** विधानसभेत सर्वसाधारणतः खालील ________ दिवशी पुरेश्या सार्वजनिक बाबीवर अर्धा तास चर्चा केली जाते.

(1) सोमवार व मंगळवार (2) मंगळवार व बुधवार (3) मंगळवार व गुरुवार (4) बुधवार व शुक्रवार

---

**138.** एखादा ठराव विधानसभेत स्वीकार्ह व्हावा यासाठी ठरावाचे स्वरूप व तपशील कोणत्या नियमाद्वारे स्पष्ट केलेले आहे ?

(1) विधानसभा नियम 106 (2) विधानसभा नियम 107

(3) विधानसभा नियम 108 (4) विधानसभा नियम 109

---

**139.** विधानपरिषद नियम 66 नुसार सार्वजनिक हिताच्या गोष्टीसंदर्भात माहिती मिळविण्यासाठी ________ यांना उद्देशून प्रश्न विचारला जातो.

(1) सभापती (2) विधानमंडळाचे सचिव

(3) संबंधित विभागाचे मंत्री (4) संबंधित विभागाचे सचिव

---

**कच्च्या कामासाठी जागा**

www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial

**140.** खालीलपैकी योग्य विधान ओळखा :

(a) विधानसभेमध्ये कोणत्याही निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या बाबीवर सदस्यास अल्पवेळ चर्चा उपस्थित करावयाची असेल ती बाब स्पष्ट व नेमकी असावी.

(b) परंतु संबंधित बाबीवर चर्चा उपस्थित करावयाची कारणे, स्पष्टीकरणाची टिप्पणी जोडणे आवश्यक नसते.

**पर्यायी उत्तरे :**

(1) फक्त (a) बरोबर (2) फक्त (b) बरोबर

(3) (a) व (b) दोन्ही बरोबर (4) (a) व (b) दोन्ही चूक

---

**141.** विधानमंडळाच्या सदस्यत्वाकरिता उमेदवाराच्या अर्हतेबाबत खालीलपैकी कोणती विधाने **बरोबर** आहेत ?

(a) विधानसभेसाठी वयाची किमान 25 वर्षे पूर्ण.

(b) विधानपरिषदेसाठी वयाची किमान 35 वर्षे पूर्ण.

(c) भारताचा नागरिक असावा.

**पर्यायी उत्तरे :**

(1) (a), (b), (c) (2) फक्त (c) (3) (a) व (c) (4) यापैकी नाही

---

**142.** प्रत्येक मंत्र्यास व राज्याच्या _________ विधानसभेत किंवा विधानपरिषद असलेल्या राज्याच्या बाबतीत, दोन्ही सभागृहात भाषण करण्याचा आणि अन्यथा त्यांच्या कामकाजात भाग घेण्याचा हक्क असेल.

(1) मुख्य न्यायाधीशास (2) मुख्य सचिवास (3) महाधिवक्त्यास (4) यापैकी नाही

---

**143.** नागरिकांना भारताच्या राज्यक्षेत्रात सर्वत्र _________ लाभावी यासाठी राज्य प्रयत्नशील राहील.

(1) सुखशांती (2) एकरूप नागरी संहिता

(3) एकरूप ज्ञान संहिता (4) विविध भाषा संहिता

---

**144.** राज्यपाल ज्या दिनांकास आपले अधिकार पद ग्रहण करतील त्या दिनांकापासुन _________ अवधीपर्यंत, ते अधिकार पद धारण करतील.

(1) 2 वर्षे (2) 4 वर्षे (3) 3 वर्षे (4) 5 वर्षे

---

**कच्च्या कामासाठी जागा**



www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial

145. राज्य विधानमंडळातील कामकाज राज्याच्या ________ चालविण्यात येईल.

(1) राज्याच्या राजभाषेतून किंवा राजभाषांतून
(2) राज्याच्या राजभाषेतून किंवा राजभाषांतून किंवा हिंदीतून किंवा इंग्रजीतून
(3) हिंदीतून
(4) इंग्रजीतून

146. राज्यपाल राज्याच्या विधानमंडळाच्या कोणत्या सभागृहाचा सदस्य असतो ?

(1) विधानसभा (2) विधानपरिषद
(3) उपरोक्तपैकी दोन्ही चालेल (4) कोणत्याही सभागृहाचा सदस्य नसतो

147. ________ कायद्याद्वारे, राज्याच्या विधानमंडळाच्या कोणत्याही सभागृहाच्या किंवा सभागृहांच्या सचिवालयीन कर्मचारी वर्गात करावयाची भरती व त्यात नियुक्त केलेल्या व्यक्तींच्या सेवाशर्ती यांचे विनियमन करता येईल.

(1) महाराष्ट्र राज्य लोकसेवा आयोगाला (2) राज्याच्या विधानमंडळाला
(3) राज्याच्या मंत्रीपरिषदेला (4) राज्याच्या मुख्यमंत्र्याला राज्यपालांच्या सहमतीने

148. एखाद्या विधेयकात खालीलपैकी कोणत्या बाबी अंतर्भूत असतील तर ते धनविधेयक असल्याचे मानले जाईल ?

(1) राज्याच्या एकत्रित निधीतील पैशांचे विनियोजन.
(2) कोणताही कर बसविणे, रद्द करणे, माफ करणे.
(3) राज्य शासनाने पैसा कर्जाऊ घेणे किंवा कोणतीही हमी देणे.
(4) वरील सर्व.

149. विधानपरिषद निर्माण करण्याकरिता, त्या राज्याच्या विधानसभेने सभागृहाच्या एकूण सदस्य संख्येच्या बहुमताने आणि सभागृहातील उपस्थित असलेल्या व मतदान करणाऱ्या सदस्यांच्या ________ हून कमी नाही इतक्या बहुमताने ठराव पारित करणे आवश्यक आहे.

(1) 1/4 (2) 2/3 (3) 3/4 (4) वरीलपैकी नाही

150. महाधिवक्ता ________ मर्जी असेपर्यंत अधिकारपद धारण करतील.

(1) विधानसभेची (2) मुख्यमंत्र्यांची (3) राज्यपालांची (4) राष्ट्रपतींची

**कच्च्या कामासाठी जागा**

www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial

## विभाग 'क'

76. राज्य लोकसेवा आयोगाने केलेल्या कामाचा अहवाल राज्याच्या विधीमंडळासमोर ठेवण्याची व्यवस्था कोण करतो ?

(1) राज्याचे राज्यपाल (2) राज्य लोकसेवा आयोगाचे अध्यक्ष

(3) राज्याचे मुख्यमंत्री (4) राज्याचे मुख्य सचिव

77. राज्य लोकसेवा आयोगाचे सेवानिवृत्त अध्यक्ष खालील पैकी कोणती निवडणूक लढविण्यास पात्र ठरतील ?

(1) राष्ट्रपती (2) लोकसभा (3) विधानसभा (4) वरील सर्व

78. स्वेच्छा निवृत्ती घेण्याकरीता किमान ________ वर्षे शासकीय सेवा असणे आवश्यक आहे.

(1) 15 (2) 20 (3) 30 (4) 33

79. अपंग आरक्षणाबाबत खालीलपैकी कोणते विधान सत्य आहे ?

(1) अपंगाकरिता 15% पदे आरक्षीत असतात

(2) अपंगांकरिता पद आरक्षीत नसले तरी त्यांना वयात सवलत देण्यात येते

(3) वरील दोन्ही

(4) वरीलपैकी एकही नाही

80. सरळ सेवेने भरल्या जाणाऱ्या पदांसाठी उमेदवारांस अंतिम निवडीसाठी विचारक्षेत्रात येण्यासाठी मुलाखतीस कमीत-कमी किती गुण मिळविणे आवश्यक आहे ?

(1) 25% (2) 35% (3) 40% (4) 41%

81. संविधानाच्या कोणत्या अनुच्छेदान्वये राज्यपालांना आयोगाच्या कर्मचारी वर्गाच्या सदस्यांची संख्या आणि त्यांच्या सेवाशर्ती या बाबत तरतूद करता येईल ?

(1) अनुच्छेद - 318 (क) (2) अनुच्छेद - 319 (ख)

(3) अनुच्छेद - 318 (ख) (4) अनुच्छेद - 319 (घ)

82. नव्याने तयार करण्यात आलेल्या अभ्यास क्रमानुसार राज्यसेवा (मुख्य) लेखी परिक्षेस एकूण पेपर व एकूण गुण किती ?

(1) 6 - 1200 (2) 8 - 1600 (3) 6 - 900 (4) 6 - 800

**कच्च्या कामासाठी जागा**



www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial

83. वार्षिक अहवाल सादर करतांना ज्या प्रकरणी आयोगाचा सल्ला स्विकारला नाही अशी प्रकरणे असल्यास, अशा प्रकरणी अस्वीकृतीची कारणे स्पष्ट करणाऱ्या निवेदनाची एक प्रत विधान मंडळासमोर सादर करण्याची तरतूद संविधानाच्या कोणत्या अनुच्छेदाद्वारे करण्यात आली आहे.

(1) अनुच्छेद - 323 (2) अनुच्छेद - 317 (3) अनुच्छेद - 319 (4) अनुच्छेद - 315

84. राज्य लोकसेवा आयोगाचे सदस्य होण्यासाठी संबंधित व्यक्तीने भारत सरकार किंवा राज्य शासनाच्या नियंत्रणाखाली किती वर्षे सेवा करणे अपेक्षीत आहे.

(1) 25 वर्षे (2) 20 वर्षे (3) 15 वर्षे (4) 10 वर्षे

85. राज्य लोकसेवा आयोगाचा अध्यक्ष सेवानिवृत्त झाल्यावर खालील पदांवर नियुक्ती स्विकारण्यास पात्र असेल :

(1) संघ लोकसेवा आयोगाचा अध्यक्ष (2) संघ लोकसेवा आयोगाचा सदस्य

(3) अन्य लोकसेवा आयोगाचा अध्यक्ष (4) वरील सर्व

86. आयोगाकडे माहितीसाठी सादर केल्या जाणाऱ्या प्रकरणांवर निर्देशन (Marking) कोणत्या क्रमाने करण्याची पध्दत आहे ?

(1) कनिष्ठ सदस्यांकडून जेष्ठ सदस्य आणि त्यानंतर अध्यक्ष

(2) प्रथम अध्यक्ष त्यानंतर जेष्ठतेनुसार सदस्य

(3) प्रथम अध्यक्ष त्यानंतर कोणत्याही सदस्याकडे

(4) असा कोणताही क्रम निश्चित नाही

87. संघ व राज्य लोकसेवा आयोगाची कार्ये संविधानाच्या कोणत्या अनुच्छेदान्वये निश्चित करण्यात आली आहेत :

(1) अनुच्छेद - 317 (2) अनुच्छेद - 319 (3) अनुच्छेद - 320 (4) अनुच्छेद - 315

88. लोकसेवा आयोगाच्या सदस्यांपैकी किमान किती सदस्य हे शासकीय सेवेतील असावेत :

(1) 10% (2) 50% (3) 60% (4) 75%

89. लोकसेवा आयोगाच्या सदस्याच्या सेवाशर्तीमध्ये त्याला नुकसानकारक असा बदल त्याच्या नियुक्तीनंतर केला जावू शकतो हे विधान :

(1) बरोबर आहे (2) चूक आहे

(3) अंशत: बरोबर आहे (4) निश्चित सांगता येत नाही

**कच्च्या कामासाठी जागा**

www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial

90. दोन किंवा अधिक राज्यांच्या समूहाकरीता एकच लोकसेवा आयोग नियुक्त केला असेल तर त्याला कोणत्या नावाने संबोधतात :

(1) संघ लोकसेवा आयोग (2) राज्य लोकसेवा आयोग
(3) मिश्र लोकसेवा आयोग (4) संयुक्त राज्य लोकसेवा आयोग

91. आयोगाच्या सरळसेवा विभागांतर्गत-एकूण किती कक्ष येतात ?

(1) 4 (2) 5 (3) 6 (4) 2

92. लोकसेवा आयोगाचे अध्यक्ष किंवा सदस्यांस पदावरुन दूर करताना राष्ट्रपती सदर प्रकरण कोणाकडे चौकशीकरिता पाठवितात :

(1) राज्यपाल (2) सर्वोच्च न्यायालय (3) उच्च न्यायालय (4) लोकसभा

93. सध्या कार्यरत असलेले आयोगाचे सचिव कोणत्या सेवेतून प्रतिनियुक्तीने आले आहेत ?

(1) सामान्य राज्यसेवा (2) भारतीय टपालसेवा
(3) भारतीय वनसेवा (4) भारतीय प्रशासकीय सेवा

94. माहितीचा अधिकार अधिनियम 2005 अन्वये प्रथम अपिलीय अधिकाऱ्याने अपील किती दिवसांत निकाली काढणे अपेक्षीत आहे ?

(1) 30 (2) 45 (3) 60 (4) 90

95. आयोगातर्फे घेण्यात येणाऱ्या मुलाखतीच्या वेळी आयोगाला सहाय्य करण्यास येणारा शासन प्रतिनिधी हा खाली नमूद केलेल्या पदापेक्षा कनिष्ठ दर्जाचा असू नये ?

(1) सचिव (2) संचालक
(3) सहसचिव किंवा सहसंचालक (4) मुख्य सचिव

96. राज्य शासनाच्या नियंत्रणाखालील पदे वगळता अन्य कोणत्या संस्थेतील पदे आयोगा मार्फत भरली जातात ?

(1) सिडको (2) म्हाडा
(3) बी.एम.सी. व बी.ई.एस.टी. (4) नवी मुंबई महानगर पालिका

**कच्च्या कामासाठी जागा**



www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial

97. आयोगाकडून घेतल्या जाणाऱ्या परिक्षांचे निकाल तयार करण्याचे काम कोणत्या खाजगी संस्थेकडे सोपविण्यात आले आहे :

(1) Tata Consultancy Services (TCS) (2) Exxon Computers Pvt. Ltd.
(3) Indradhanush (4) MKCL

98. स्पर्धा तसेच चाळणी परिक्षांच्या निकाल प्रक्रीयेसंदर्भात संगणक संस्थेकडून अहवाल प्राप्त झाल्यानंतर 25% तपासणी कोणत्या अधिकाऱ्यांने करणे अपेक्षित आहे ?

(1) सचिव (2) अवर सचिव (3) कक्ष-अधिकारी (4) वरीलपैकी नाही

99. राज्य लोकसेवा आयोगाच्या सदस्यांची संख्या खालील अनुच्छेदानुसार निर्धारित करण्यात येते :

(1) 317 (2) 318 (3) 302 (4) 320

100. आयोगाच्या कार्यालयातील गट 'क' च्या कर्मचाऱ्यांचे अपील अधिकारी ________ आहेत.

(1) राज्यपाल (2) अध्यक्ष (3) सचिव (4) यापैकी नाही

101. राज्यशासनाने लागू केलेल्या समांतर आरक्षणामध्ये खालीलपैकी कोणत्या प्रवर्गाचे आरक्षण मोडत नाही ?

(1) महिला आरक्षण (2) खेळाडू आरक्षण
(3) मागासवर्गीय आरक्षण (4) प्रकल्प ग्रस्त आरक्षण

102. राज्य लोकसेवा आयोगाचा सदस्य ________ यांस संबोधून लिहिलेल्या स्वाक्षरीत पत्राद्वारे आपला राजीनामा देवू शकेल.

(1) अध्यक्ष (2) राज्यपाल (3) राष्ट्रपती (4) सभापती

103. संविधानात लोकसेवा आयोगाशी संबंधित अनुच्छेद किती ते किती आहेत ?

(1) 217 ते 223 (2) 317 ते 323 (3) 315 ते 323 (4) 215 ते 223

104. राज्य लोकसेवा आयोगाच्या सदस्यांस निलंबित करण्याचा अधिकार कोणास आहे ?

(1) राज्य लोकसेवा आयोगाचे अध्यक्ष (2) राज्याचे मुख्यमंत्री
(3) उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश (4) वरीलपैकी नाही

**कच्च्या कामासाठी जागा**

www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial

**105.** राज्य लोकसेवा आयोगास अतिरीक्त कार्ये सोपविणे कोण ठरविते ?

(1) राष्ट्रपती (2) राज्यपाल (3) मंत्रीमंडळ (4) राज्य विधानमंडळ

**106.** गट 'अ' मध्ये वर्गीकरण केलेली नस्ती :

(1) तात्काल नष्ट करता येते (2) 6 महिन्यानंतर नष्ट करता येते

(3) 1 वर्षानंतर नष्ट करता येते (4) कायम स्वरूपी जतन करावयाची असते

**107.** आयोगा मार्फत भरण्यात येणाऱ्या पदांपैकी कोणत्या पदास कोणतेही आरक्षण लागू नाही ?

(1) APP (2) ARTO (3) JMFC (4) PSI

**108.** राज्य शासनाच्या अखत्यारीतील पदांना महिलांसाठी 30% आरक्षण केव्हा पासून लागू करण्यात आले आहे ?

(1) 25 मे 2001 (2) 25 मे 2005 (3) 18 ऑक्टोबर 1997 (4) वरीलपैकी नाही

**109.** आयोगाच्या आस्थापनेवरील कोणत्या पदाचे सेवा प्रवेश नियम नव्याने तयार करण्यात येत आहेत ?

(1) PRO (2) ERO (3) सह सचिव (4) सचिव

**110.** आयोगामार्फत स्पर्धा परिक्षेद्वारे भरण्यात येणाऱ्या कोणत्या पदासाठी वय गणन्याची तारीख जाहिरात कधीहीं प्रसिध्द करण्यात आली तरी एकच (1 एप्रिल) असते.

(1) दिवाणी न्यायाधीश (2) पोलीस उप-निरीक्षक

(3) उपजिल्हाधिकारी (4) सहायक

**111.** **आयोगाच्या** कार्यकक्षेतील पदांवर तात्पुरत्या स्वरूपात करावयाच्या नियुक्त्या एक वर्षापेक्षा अधिक कालावधीसाठी असतील तर खालीलपैकी कोणाची सहमती घेण्याची आवश्यकता आहे ?

(1) सा.प्र.वि. (2) मुख्यमंत्री कार्यालय (3) वित्त विभाग (4) म.लो.आ.

**112.** एखाद्या प्रकरणी मंत्रालयीन विभागास आयोगाने दिलेला सल्ला स्वीकारावयाचा नसल्यास प्रकरण कोणाकडे आदेशार्थ सादर केले जाते ?

(1) सा.प्र.वि. मार्फत मुख्य सचिवांकडे

(2) संबंधित विभागाचे सचिव त्या विभागाच्या मंत्र्यांकडे

(3) सा.प्र.वि. संबंधित विभागाच्या मंत्र्यामार्फत मुख्यमंत्र्यांकडे

(4) संबंधित विभागाचे मंत्री मुख्यमंत्र्यांकडे

**कच्च्या कामासाठी जागा**

**P.T.O.**

www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial

**113.** आयोगाच्या कार्यकक्षेतील पदांचे सेवा प्रवेश नियम विहित करताना सेवा प्रवेश नियमाच्या मसुदयास आयोगाने मान्यता दिल्यानंतर सदर मसुदा कोणत्या विभागाकडे अभिप्रायार्थ पाठविलाजातो ?

(1) सा.प्र.वि. (2) वित्त विभाग

(3) विधी व न्याय विभाग (4) समाजकल्याण विभाग

---

**114.** विवाहित महिला कर्मचाऱ्याची शासनाच्या बृहन्मुंबईतील कार्यालयात बदलीने नेमणूक करण्यापूर्वी कोणत्या विभागाची सहमती घेणे आवश्यक आहे ?

(1) म.लो.आ. (2) बृहन्मुंबई महानगरपालिका

(3) वित्त विभाग (4) वरील एकही नाही

---

**115.** महाराष्ट्र अभियांत्रिकी परीक्षेत अंतर्भूत असलेल्या सहायक अभियंता, गट - ब जीवन प्राधिकरण विभागाचे मागणीपत्र म.लो.आ. ला कोणत्या विभागाकडून प्राप्त होते ?

(1) जीवन प्राधिकरण विभाग (2) सार्वजनिक बांधकाम विभाग

(3) पाटबंधारे विभाग (4) पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग

---

**116.** शासकीय व निमशासकीय कार्यालयात गट ब च्या पदासाठी खेळाडूसाठी आरक्षण मिळण्यासाठी कोणत्या स्तरावरील प्रमाणपत्र आवश्यक आहे ?

(1) विद्यापीठ स्तर (2) आंतरराष्ट्रीय स्तर (3) राष्ट्रीय स्तर (4) राज्य स्तर

---

**117.** राज्यातील विमुक्त जाती, भटक्या जमाती, इ.मा.व. व विशेष मागास प्रवर्गासाठी नॉन क्रिमीलेयरसाठी असलेली उत्पन्न मर्यादा किती आहे ?

(1) चार लाख पन्नास हजार (2) सहा लाख

(3) चार लाख (4) तीन लाख पन्नास हजार

---

**118.** आयोगाच्या कार्यालयातील अवर सचिवाची नियुक्ती तीन महिन्यापेक्षा अधिक कालावधीसाठी नसेल तर कोणाची मान्यता आवश्यक आहे ?

(1) सामान्य प्रशासन विभाग (2) आयोगाचे अध्यक्ष

(3) राज्यपाल (4) आयोगाचे सचिव

---

**119.** शासकीय कर्मचारी/अधिकाऱ्याने सेवा विषयक बाबी संदर्भात थेट म.लो.आ. चे अध्यक्ष/सदस्य यांच्याशी संपर्क साधूनये या संदर्भात शासनाने खालीलपैकी कोणत्या पत्रव्यवहाराचा अवलंब केला आहे ?

(1) शासननिर्णय (2) शासन अधिसूचना (3) शासन परिपत्रक (4) शासन आदेश

---

**कच्च्या कामासाठी जागा**

www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial

**120.** राज्य सेवेतील खालील कोणत्या पदासाठी रंगांधळेपणा हा विकार नसणे आवश्यक आहे ?

(1) अधिक्षक, राज्य उत्पादन शुल्क, गट-अ

(2) पोलीस उपअधिक्षक/सहायक पोलीस आयुक्त, गट - अ

(3) सहायक प्रादेशिक परिवहन अधिकारी, गट-ब

(4) महा.वित्त व लेखा सेवा, गट-अ

---

**121.** पोलीस उपनिरीक्षक मर्यादित विभागीय (पूर्व) परीक्षा राज्यातील किती जिल्हा केंद्रांवर घेण्यात येते ?

(1) 4 जिल्हा केंद्रे (2) 7 जिल्हा केंद्रे (3) 33 जिल्हा केंद्रे (4) 35 जिल्हा केंद्रे

---

**122.** महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कक्षेतील पदांवर तदर्थ/अस्थायी नियुक्ती केल्यानंतर त्या संदर्भातील आदेशाच्या प्रती कोणत्या विभागास अग्रेषित करणे आवश्यक आहे ?

(1) सा.प्र.वि. व वित्त विभाग (2) विधी व न्याय विभाग व म.लो.आ.

(3) सा.प्र.वि. व विधी व न्याय विभाग (4) सा.प्र.वि. व म.लो.आ.

---

**123.** कोणत्या कालावधीतील कामे आयोगाचा वार्षिक अहवाल तयार करताना विचारात घेण्यात येतात ?

(1) 1 एप्रिल ते 31 मार्च (2) 1 जानेवारी ते 31 डिसेंबर

(3) 1 फेब्रुवारी ते 31 जानेवारी (4) 1 जुलै ते 30 जून

---

**124.** आयोगामार्फत घेतल्या जाणाऱ्या विविध स्पर्धा परीक्षा व सरळ सेवा भरती प्रकरणी अंतिम निकाल तयार करताना समान गुण धारण करणाऱ्या अर्हताप्राप्त उमेदवारांची प्राधान्य क्रमवारी ठरविण्यात आली आहे. त्याची क्रमवारी निश्चित करावी.

(a) जाहिरातीत अनुभव विहीत केला असल्यास अंतिम दिनांकास धारण करीत असलेला अनुभवाचा कालावधी.

(b) जाहिरातीत मागासवर्गीय उमेदवारांना प्राधान्य देण्याची तरतूद विहीत केली असल्यास मागासवर्गीय उमेदवार आणि त्यामध्ये अज अजा.वि.ज(अ) भज (ब), वि.मा.प्र. भज (क) भज (ड), इमाव या क्रमाने

(c) वयाने जेष्ठ असलेला.

(d) अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकास धारण केलेली उच्च शैक्षणिक अर्हता.

**पर्यायी उत्तरे :**

(1) (d), (b), (a), (c) (2) (d), (a), (b), (c) (3) (c), (b), (a), (d) (4) (b), (d), (c), (a)

---

**कच्च्या कामासाठी जागा**



www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial

125. राज्य सेवा (पूर्व) परीक्षेच्या उत्तरपत्रिकांचे मूल्यांकन करताना उमेदवाराच्या उत्तरपत्रिकेतील किती चुकीच्या उत्तराबद्दल किती गुण वजा करण्यात येतात ?

(1) चार चुकीच्या उत्तरांबद्दल एक गुण
(2) तीन चुकीच्या उत्तरांबद्दल एक गुण
(3) प्रत्येक चुकीच्या उत्तरांसाठी एक तृतीयांश गुण
(4) प्रत्येक चुकीच्या उत्तरांसाठी एक द्वितीयांश गुण

---

126. अपंग व्यक्ती (समानसंधी संपूर्ण सहभाग व हक्कांचे संरक्षण) अधिनियम 1995 मधील तरतुदीनुसार खालीलपैकी कोणत्या अपंग प्रवर्गास अपंग आरक्षणाचा फायदा मिळू शकत नाही ?

(1) अस्थिव्यंग
(2) अंशत: कर्णबधीर
(3) मेंदूचा अर्धांगवायू
(4) क्षीणदृष्टी

---

127. आयोगाच्या उपसचिवांना निवृत्तीवेतन व उपदान मंजूर करणारा प्राधिकारी कोण आहे ?

(1) सामान्य प्रशासन विभाग
(2) राज्यपाल
(3) आयोगाचे अध्यक्ष
(4) आयोगाचे सचिव

---

128. शासनाच्या इतर विभागांनी आयोगाशी पत्रव्यवहार करण्यापूर्वी पत्राच्या प्रारूपास कोणत्या विभागाची मान्यता घेणे आवश्यक आहे ?

(1) म.लो.आ.
(2) सा.प्र.वि.
(3) विधी व न्याय विभाग
(4) वित्त विभाग

---

129. मुंबई महानगरपालिका अधिनियम 1988 च्या कोणत्या कलमाआधारे बृहन्मुंबई विद्युत पुरवठा व परिवहन उपक्रमातील गट-अ (2) आणि त्यावरील श्रेणीच्या पदांवरील नियुक्तीबाबत आयोग सल्ला देते ?

(1) कलम 80 (अ)
(2) कलम 80 (ब)
(3) कलम 80 (क)
(4) कलम 80 (ड)

---

130. माजी सैनिकांसाठी विहीत केलेले आरक्षण खालीलपैकी कोणत्या पदास लागू राहील ?

(a) अधीक्षक, सामान्य राज्य सेवा
(b) लघुटंकलेखक
(c) अनुवादक
(d) गृहपाल

**पर्यायी उत्तरे :**

(1) (a) आणि (b)
(2) (b) आणि (c)
(3) फक्त (b)
(4) वरील सर्व

---

**कच्च्या कामासाठी जागा**

www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial

**131.** एखाद्या पदासाठी जाहिरात देताना त्या जाहिरातीमध्ये सदर पदाची कर्तव्ये व जबाबदाऱ्या खालील वेबसाइटद्वारे उपलब्ध होतील असे नमूद करण्यात येते ?

(1) www.mpsc.gov.in. (2) www.mpsconline.gov.in.
(3) www.nic.gov.in. (4) www.upsc.gov.in.

---

**132.** महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या वार्षिक अहवालात किती भाग असतात ?

(1) आठ (2) बारा (3) दहा (4) सात

---

**133.** गाळलेला शब्द भरा :

राज्यपाल, विशेष कारणास्तव महाराष्ट्र राज्य लोक सेवा आयोगाच्या कोणत्याही सदस्याने केलेल्या सेवेच्या कालावधीत ________ महिन्यापेक्षा अधिक नसेल एवढया कालावधीची भर घालू शकतील.

(1) दोन (2) तीन (3) सहा (4) अकरा

---

**134.** सेवा भरती करण्याकरिता शासन परिपत्रकानुसार विहीत अनुभव मोजताना खालीलपैकी कोणता अनुभव पूर्णवेळ काम केले असल्यास ग्राह्य धरण्यात येतो ?

(1) विद्यावेतनी (2) अतिरिक्त कार्यभार (3) अंश कालीन (4) कंत्राटी

---

**135.** आयुक्त विक्री कर कार्यालय यांना एका प्रकरणी आयोगाचा सल्ला आवश्यक आहे. त्यांनी कोणत्या विभागाकडे संदर्भ करणे आवश्यक आहे ?

(1) सचिव म.लो.आ. (2) सचिव नगर विकास विभाग
(3) सचिव वित्त विभाग (4) मुख्य सचिव सा.प्र.वि.

---

**136.** राज्य सेवेतील खालील कोणत्या पदासाठी से.प्र.नियमात शारीरिक अर्हता विहित करण्यात आलेली नाही ?

(1) सहायक आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क, गट-ब
(2) अधिक्षक राज्य उत्पादन शुल्क, गट-अ
(3) पोलीस उपअधिक्षक/सहायक पोलीस आयुक्त, गट - अ
(4) सहायक प्रादेशिक परिवहन अधिकारी, गट - ब

---

**137.** शासकीय कर्मचाऱ्यांसाठी घेण्यात येणाऱ्या विभागीय परीक्षा वर्षातून किती वेळा घेतल्या जातात ?

(1) एकदा (2) दोनदा (3) तीनदा (4) चारदा

---

**कच्च्या कामासाठी जागा**



www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial

**138.** आयोगाचे सचिव, याचा नियुक्तीच्या वेळी निश्चित केलेला पदावधी अधिक कालावधीसाठी वाढविण्याचे प्राधिकार कोणास आहेत ?

(1) आयोगाचे अध्यक्ष (2) राज्यपाल (3) सामान्य प्रशासन विभाग (4) मुख्यमंत्री

**139.** आयोगातर्फे प्रसिद्ध करण्यात येणाऱ्या सरळ सेवा भरतीच्या जाहिरातीच्या अनुषंगाने विहीत अनुभवाची अट नसलेल्या पदांसाठी अर्ज करणाऱ्या मागासवर्गीय उमेदवाराने किती शुल्क भरणे आवश्यक आहे ?

(1) रु. 265 (2) रु. 140 (3) रु. 215 (4) रु. 165

**140.** आयोगातर्फे घेण्यात येणाऱ्या राज्य सेवा परीक्षेत शासनाच्या विविध विभागातील किती पदांचा समावेश आहे ?

(1) 16 पदे (2) 17 पदे (3) 18 पदे (4) 19 पदे

**141.** आयोगाने JMFC पदासाठी 1 जानेवारी 2012 रोजी जाहिरात प्रसिद्ध केली असून अर्ज स्वीकारण्याचा अंतिम दिनांक 21 जानेवारी 2012 विहित केला आहे. सदर परीक्षेसाठी उमेदवाराने शैक्षणिक अर्हता कोणत्या दिनांकास प्राप्त करणे आवश्यक आहे ?

(1) 30 जानेवारी 2012 (2) 21 जानेवारी 2012 (3) 1 मे 2012 (4) 1 जानेवारी 2012

**142.** आयोगातर्फे घेण्यात येणाऱ्या राज्यसेवा (मुख्य) परीक्षेद्वारे मुलाखतीकरिता अर्हता प्राप्त ठरण्यासाठी सर्व प्रश्नपत्रिका मिळून एकत्रित गुणांपैकी मागास वर्गवारीसाठी किमान किती गुणांचा परसेंटाईल निकष विहीत करण्यात आला आहे ?

(1) 30% (2) 45% (3) 40% (4) 35%

**143.** खालीलपैकी कोणती प्रकरणे शासनाकडून आयोगाच्या मान्यतेसाठी पाठविली जात नाहीत ?

(1) बदलीने नियुक्ती (2) मानीव दिनांक
(3) अनुकंपातत्वावरील नियुक्ती (4) इजा निवृत्ती वेतन

**144.** मुलाखत पात्र उमेदवारांना त्यांचे मुलाखत पत्र :

(1) त्यांच्या प्रोफाईल मध्ये उपलब्ध केले जाते. (2) स्पीड पोस्ट ने पाठविण्यात येते.
(3) नोंदणीकृत टपालाने पाठविण्यात येते. (4) व्यक्तिश: बोलावून देण्यात येते.

**145.** आयोगाचे अध्यक्ष सेवानिवृत्त होत असतील किंवा राजीनामा देत असतील तेव्हा त्यांच्या रिक्त पदांवरील कार्यभार जेष्ठ सदस्यांनी स्वीकारावा या बाबतचे आदेश देण्याचे प्राधिकार कोणास आहेत ?

(1) मुख्य सचिव (2) निवृत्त होणारे आयोगाचे अध्यक्ष
(3) राज्यपाल (4) मुख्यमंत्री

**कच्च्या कामासाठी जागा**

www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial

**146.** पोलीस उपनिरीक्षक पदाकरीता पुरुष उमेदवाराची किमान उंची __________ से.मी. असणे आवश्यक आहे.

(1) 165 से.मी. (2) 175 से.मी. (3) 150 से.मी. (4) 160 से.मी.

**147.** शासन सेवेत सरळ सेवा भरतीसाठी भज (क) प्रवर्गासाठी सामाजिक आरक्षणाची टक्केवारी किती आहे?

(1) 3% (2) 2.5% (3) 3.5% (4) 2%

**148.** राज्य शासनाच्या सेवेत अनुसुचित जाती प्रवर्गाकरीता आरक्षण __________% आहे.

(1) 4 (2) 10 (3) 13 (4) 15

**149.** अनुभवाची गणना करताना जिल्हा–परिषद कर्मचाऱ्याची सेवा ही :

(1) शासकीय सेवा म्हणून ग्राह्य नाही.
(2) शासकीय सेवा म्हणून ग्राह्य आहे.
(3) खाजगी सेवा आहे.
(4) रोजंदारी शासकीय सेवा आहे.

**150.** 'तात्काळ' शेरा असलेले टपाल __________ दिवसात सादर करणे आवश्यक असते.

(1) 30 दिवसांच्या आत
(2) 15 दिवसात
(3) 7 दिवसात
(4) त्याच दिवशी किंवा उशीरात उशीरा दुसऱ्या दिवशी

-oOo-

**कच्च्या कामासाठी जागा**

P.T.O.

www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial

**सूचना — ( पृष्ठ 1 वरून पुढे.... )**

(8) प्रश्नपुस्तिकेमध्ये विहित केलेल्या विशिष्ट जागीच कच्चे काम (रफ वर्क) करावे. प्रश्नपुस्तिकेव्यतिरिक्त उत्तरपत्रिकेवर वा इतर कागदावर कच्चे काम केल्यास ते कॉपी करण्याच्या उद्देशाने केले आहे, असे मानले जाईल व त्यानुसार उमेदवारावर शासनाने जारी केलेल्या "परीक्षांमध्ये होणाऱ्या गैरप्रकारांना प्रतिबंध करण्याबाबतचे अधिनियम-82" यातील तरतुदीनुसार कारवाई करण्यात येईल व दोषी व्यक्ती कमाल एक वर्षाच्या कारावासाच्या आणि/किंवा रुपये एक हजार रकमेच्या दंडाच्या शिक्षेस पात्र होईल.

(9) सदर प्रश्नपत्रिकेसाठी आयोगाने विहित केलेली वेळ संपल्यानंतर उमेदवाराला ही प्रश्नपुस्तिका स्वत:बरोबर परीक्षाकक्षाबाहेर घेऊन जाण्यास परवानगी आहे. **मात्र परीक्षा कक्षाबाहेर जाण्यापूर्वी उमेदवाराने आपल्या उत्तरपत्रिकेचा भाग-1 समवेक्षकाकडे न विसरता परत करणे आवश्यक आहे.**

---

## नमुना प्रश्न

**प्रश्न क्र. 201.** सतीची चाल नष्ट करण्यासाठी कोणी मूलत: प्रयत्न केले?

(1) स्वामी दयानंद सरस्वती (2) ईश्वरचंद विद्यासागर

(3) राजा राममोहन रॉय (4) गोपाळकृष्ण गोखले

ह्या प्रश्नाचे योग्य उत्तर "(3) राजा राममोहन रॉय" असे आहे. त्यामुळे या प्रश्नाचे उत्तर "(3)" होईल. यास्तव खालीलप्रमाणे प्रश्न क्र. **201** समोरील उत्तर-क्रमांक "③" हे वर्तुळ पूर्णपणे छायांकित करून दाखविणे आवश्यक आहे.

प्र. क्र. **201.** ① ② ● ④

अशा पद्धतीने प्रस्तुत प्रश्नपुस्तिकेतील प्रत्येक प्रश्नाचा तुमचा उत्तरक्रमांक हा तुम्हाला स्वतंत्ररीत्या पुरविलेल्या उत्तरपत्रिकेवरील त्या त्या प्रश्नक्रमांकासमोरील संबंधित वर्तुळ पूर्णपणे छायांकित करून दाखवावा. **ह्याकरिता फक्त काळ्या शाईचे बॉलपेन वापरावे, पेन्सिल वा शाईचे पेन वापरू नये.**

---

**कच्च्या कामासाठी जागा /SPACE FOR ROUGH WORK**

www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial